रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक १४३
www.ramprahar.com
◆ बुधवार, १० डिसेंबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## ‘इंडिगो’च्या विमान उड्डाणांमध्ये १० टक्क्यांची कपात



**नवी दिल्ली :** इंडिगो कंपनी एअरलाइनचे मुख्य कार्यकारी अधिकारी पीटर एल्बर्स यांना मंगळवारी (दि.९) नागरी उड्डयन मंत्रालयाच्या मुख्यालयात बोलाविण्यात आले होते. या महत्त्वाच्या बैठकीत केंद्रीय मंत्री राम मोहन नायडू आणि सचिव समीर सिन्हा यांनी इंडिगोच्या संचालन, प्रवासी सेवा, तिकिटांचा परतावा आणि सामानाची स्थिती यावर सविस्तर चर्चा केली. दरम्यान, केंद्राने कठोर भूमिका घेत कंपनीला विमान उड्डाणे रद्द होण्याचे प्रमाण कमी करण्यासाठी इंडिगोच्या एकूण ‘ऑपरेशन्स’मध्ये १० टक्क्यांची कपात करण्याचे आदेश दिले. परिचालनामध्ये आलेल्या संकटानंतर इंडिगोने आता सर्व विमानांची उड्डाणे पूर्ववत झाली असून १८००हून अधिक विमानांचे संचालन करत असल्याची माहिती दिली, मात्र केंद्राने घेत कंपनीला उड्डाणे रद्द होण्याचे प्रमाण कमी करण्यासाठी १० टक्क्यांची कपात करण्याचे आदेश दिले आहेत.

अंतरंग
रायगडातील आठ कन्याशाळांचे ’सहशिक्षण’मध्ये रूपांतर/२
आंतरराष्ट्रीय मानवाधिकार दिनानिमित्त लेख/४
आयपीएल मिनी ऑक्शनमध्ये ३५० खेळाडू/८

# शाळा-महाविद्यालय परिसरात गुटखा विक्री तत्काळ बंद करावी

## आमदार प्रशांत ठाकूर यांची हिवाळी अधिवेशनात मागणी

### ■ कायद्यात बदल करून कठोर कारवाई करणार -मुख्यमंत्री

**नागपूर : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्रातील अनेक शाळा आणि महाविद्यालयांच्या परिसरात गुटखा तसेच अमली पदार्थांची विक्री वाढत असल्याच्या गंभीर तक्रारी समोर येत आहेत. नियमांनुसार कोणत्याही शैक्षणिक संस्थेच्या १०० मीटर परिसरात अशा पदार्थांची विक्री संपूर्णपणे बंदीस्त आहे, मात्र अनेक ठिकाणी टपऱ्या आणि स्टॉल्सद्वारे या नियमांचे सर्रास उल्लंघन होत असल्याचे निदर्शनास आले असून आमदार प्रशांत ठाकूर यांनी राज्य विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात शाळा-महाविद्यालयांच्या परिसरात गुटखा विक्री तत्काळ बंद करावी, अशी मागणी करतानाच विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी शासनाचे लक्ष वेधले.




गुटखा व अमली पदार्थ विक्रीचा गंभीर मुद्दा आमदार प्रशांत ठाकूर यांनी तारांकित प्रश्नाद्वारे अधिवेशनात दाखल केला होता. या प्रश्नाच्या अनुषंगाने आमदार प्रशांत ठाकूर यांनी हा विषय प्रत्यक्ष विधीमंडळाच्या सभागृहातही मांडला. महाराष्ट्रात शाळा आणि महाविद्यालयांच्या परिसरात गुटखा व त्याचबरोबर अमली पदार्थांची विक्री वाढत असल्याची गंभीर तक्रार पुढे आली आहे. शासनाच्या नियमांनुसार शैक्षणिक संस्थांच्या परिसरात अशा पदार्थांची विक्री पूर्णपणे बंदीस्त आहे. तरीही अनेक ठिकाणी टपऱ्या आणि स्टॉल्स निर्बंधांचा भंग करत सुरू असल्याचे स्थानिक नागरिकांनी निदर्शनास आणले आहे. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी आणि त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने तातडीची उपाययोजना करण्याची मागणी नागरिक, सामाजिक संघटना आणि पालकांनी प्रशासनाकडे केली आहे.

या प्रश्नावर बोलताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी म्हटले की, गुटखा आणि अमली पदार्थांची विक्री विद्यालयांच्या परिसरातील टपरी दुकानांवर सर्रासपणे होत असल्याच्या तक्रारी संपूर्ण महाराष्ट्रातून येत आहेत. या प्रश्नाच्या अनुषंगाने लेखी उत्तरात शाळा महाविद्यालय १०० मीटर परिसरामध्ये गुटखा, तंबाखू, सिगारेट विक्री करणाऱ्या टपरी, जनरल स्टोअर्स, किराणा दुकान यांचे अतिक्रमण काढण्याकरिता स्थानिक स्वराज्य संस्थांसोबत पोलीस ठाणे प्रभारी यांनी पत्रव्यवहार करावा आणि संयुक्त कारवाई पथक नियुक्त करण्यात आलेली आहेत, अशी माहिती शासनाकडून देण्यात आली आहे, मात्र जर अशी पथके नियुक्त करण्यात आली आहेत, तर लोकप्रतिनिधींना त्याची माहिती मिळाली नाही. त्यामुळे प्रत्यक्षरित्या हा आदेश झाला असेल तर त्याची अमंलबजावणी कधी होणार आणि असे पथक नियुक्त केले असेल, तर त्याची माहिती अधिकार फलकाप्रमाणे शाळा-महाविद्यालयाच्या परिसरामध्ये लावण्याची आवश्यकता आहे तसेच तक्रार केल्यानंतरही गुटखा, अमली पदार्थ विक्री करणाऱ्या टपऱ्या दुकानांना हटवले जाणार नसेल तर त्या पथकाला जबाबदार धरून त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे, अशीही मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी सभागृहात बोलताना केली. या सर्व बाबीतून गुटखा व अमली पदार्थ विक्रीचा महत्त्वपूर्ण विषय राज्य शासन दरबारी मांडून त्यांनी याकडे शासनाचे लक्ष केंद्रित केले.

यावर उत्तर देताना गृहराज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी सभागृहात सांगितले की, गुटख्यावर बंदी असतानाही काही ठिकाणी अवैध विक्री होते. त्या संदर्भात पोलिसांनी महाराष्ट्रात वेगवेगळ्या ठिकाणी कारवाई केली व त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले. या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आढावा घेतला आणि त्यानुसार गुटखा विक्री करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार शाळा-महाविद्यालयांच्या परिसरातील पोलीस प्रशासनाने या टपरी दुकाने उद्ध्वस्त करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेला कारवाई करण्याचे निर्देश दिले आहे. त्याचबरोबर या संदर्भात लोकप्रतिनिधींना माहिती देण्याकरिता तातडीने त्यांच्या ठिकाणच्या पोलीस आयुक्त, पोलीस अधीक्षकांना निर्देश देऊन तशी माहिती देण्यात येइल.

गुटखा विक्री करणाऱ्यांवर मकोका लागू करण्याचा प्रस्ताव विधी व न्याय विभागाकडे पाठवण्यात आला होता. कायद्यातील तरतुदींनुसार हार्म आणि हर्ट या दोन्ही घटकांअभावी तो लागू होत नाही. त्यामुळे या कायद्यात बदल करण्यात येऊन गुटखा व्यवसाय करणाऱ्यांवरही मकोका लागू करता येईल, अशा आवश्यक दुरूस्त्या कायद्यात करण्यात येऊन हा कायदा अधिक कठोर करण्यात येईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात बोलताना दिली.

शाळा किंवा महाविद्यालयाच्या १०० मीटर परिसरात गुटखा विक्रीचे प्रकार आढळल्यास त्या परिसरातील टपऱ्या किंवा दुकानांवर संयुक्त कारवाई करण्याचे निर्देश पोलिसांना दिले आहेत. त्याचबरोबर ही कारवाई स्थानिक स्वराज्य संस्थांच्या समन्वयाने केली जाणार आहे, तर ड्रग्जच्या आहारी गेलेल्या व्यक्तींसाठी पुनर्वसन केंद्रांची आवश्यकता आहे. मुंबई महानगरमध्ये दर्जेदार पुनर्वसन केंद्रांची कमतरता असून शासन या संदर्भात आवश्यक पुढाकार घेणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

## अलिबागच्या नागावमध्ये बिबट्याची दहशत





### हल्ल्यात पाच जण जखमी

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील नागाव येथे मंगळवारी (दि. ९) मानवी वस्तीमध्ये बिबट्या शिरला. बिबट्याच्या हल्ल्यात पाच जण जखमी झाले असून वनविभाग बिबट्याला पकडण्याचे उशिरापर्यंत शर्थीने प्रयत्न करीत होते.

अमित वर्तक, प्रसाद सुतार, मंदार गडकरी यांच्यासह बचाव पथकातील कुणाल साळुंखे, वनसंरक्षक अधिकारी भाऊसाहेब जावरी अशी बिबट्याच्या हल्ल्यात जखमी झालेल्यांची नावे आहेत.

नागाव येथील वर्तकवाडी परिसरात सकाळी हा बिबट्या दिसला. बिबट्याने सर्वात आधी वाडीत काम करणाऱ्यावर हल्ला केला. बिबट्याने हल्ला करताच कामगारांनी त्यांच्या हातात असलेला कोयता बिबट्यावर फेकून मारला. त्यामुळे तो पळाला, पण बिबट्याने अचानक केलेल्या या हल्ल्यात तीन जण जखमी झाले.

घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक किशोर साळे, वनविभागाचे अधिकारी नरेंद्र पाटील, सरपंच घटनास्थळी दाखल झाले. दरम्यान, बिबट्याचा धुमाकुळ लक्षात घेऊन सुरक्षेच्या कारणास्तव नागावमधील शाळांना सुट्टी देऊन मुलांना घरी पाठवण्यात आले. पोलिसांनी नागावकडून रेवदंड्याकडे जाणारी वाहतूक पर्यायी मार्गांवर वळवली.

यानंतर वनविभागाने बिबट्याला पकडण्यासाठी मोहीम हाती घेतली. रोहा आणि पुणे येथून वाईल्ड लाईफ विभागाच्या पथकांना पाचारण करण्यात आले. साडेबाराच्या सुमारास रोह्याचे वनविभागाचे पथक घटनास्थळी दाखल झाले. त्यानंतर बिबट्याचा शोध सुरू झाला, मात्र या मोहिमेदरम्यान दुपारच्या सत्रात बिबट्याने पुन्हा तीन जणांवर हल्ला चढवला. यात दोघे गंभीर जखमी झाले. त्यांना अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. बिबट्याला पकडण्याचे प्रयत्न सुरू होते, पण बिबट्या जाळ्यात सापडला नाही.

## निवडक

### ‘मायक्रोसॉफ्ट’ भारतामध्ये करणार १७.५ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक

**न्यूयॉर्क :** मायक्रोसॉफ्ट कंपनीचे सीईओ सत्या नाडेला यांनी भारताच्या आर्टिफिशियल इंटेलिजेंस क्षेत्रात १७.५ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक करण्याची घोषणा केली आहे. आशियातील ही आतापर्यंतची मायक्रोसॉफ्टची सर्वात मोठी गुंतवणूक आहे. यातून एआयसाठी पायाभूत सुविधा, कौशल्य निर्माण केले जाईल, असेही नाडेला यांनी आपल्या एक्सवरील पोस्टमध्ये आहे. नाडेला यांच्या घोषणेनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींनीही पोस्ट शेअर करत आनंद व्यक्त केला आहे.

### अनिल अंबानी यांच्या दोन कंपन्यांविरोधात गुन्हा दाखल

**मुंबई :** सुमारे १४ हजार ८०० कोटी रुपयांच्या गैरव्यवहारप्रकरणी सीबीआयने अनिल धीरूभाई अंबानी उद्योगसमूहातील दोन कंपन्यांविरोधात मंगळवारी (दि.९) एफआयआर दाखल केले. रिलायन्स होम फायनान्स लि. आणि रिलायन्स कमर्शियल फायनान्स लि.विरोधात हे गुन्हे दाखल झाले आहेत. सीबीआयने मुंबईत अंबानी यांच्या निवासस्थानी छापे टाकून झडतीही घेतली.

## अंबादास दानवेंच्या व्हिडीओचे रायगडात पडसाद

**अलिबाग : प्रतिनिधी**

शिवसेना ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी मंगळवारी (दि. ९) सकाळी समाजमाध्यमांवर व्हिडीओ पोस्ट करत शिवसेना शिंदे गटाचे आमदार महेंद्र दळवी यांच्यावर आरोप केले. त्याचे रायगड जिल्ह्यात तीव्र पडसाद उमटले, अलिबाग, मुरूड आणि रोहा येथे आमदार दळवी समर्थक शिवसैनिकांनी निदर्शने केली. रस्त्यावर उतरत दानवे यांचा पुतळ्याचे दहन करण्यात आले.

### निदर्शने करून पुतळा जाळला

दरम्यान, आमदार महेंद्र दळवी यांनी आरोप फेटाळले आहेत. पैशांचा व्हिडीओ बनावट असून दानवे यांनी जाणीवपूर्वक बदनामीच्या हेतून तयार केल्याचे त्यांनी सांगितले. व्हिडीओ खरा असल्याचे पुरावे द्या. राजकारणातून संन्यास घेईन, असे आव्हानही त्यांनी दानवे यांना दिले आहे, तर आमदार दळवी यांच्या पत्नी माजी जि.प. सदस्य मानसी दळवी यांनी दानवेंविरोधात पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवणार असल्याचे म्हटले.

### उरणमधील तो कार्यकर्ता सतीश पाटील नव्हे; तर पटेल!

## महाविकास आघाडीच्या नेत्यांना काही काम राहिलेले नाही -आमदार महेश बालदी

**नागपूर : प्रतिनिधी**

उरणमधील प्रकरणाची पोलीस चौकशी करीत आहेत. मूळात तो मनसेचा कार्यकर्ता सतीश पाटील नसून तर सतीश पटेल आहे. महाविकास आघाडीच्या नेत्यांना काही काम राहिलेले नाही, अशा शब्दांत आमदार महेश बालदी यांनी नागपूर येथे प्रसारमाध्यमांशी बोलताना आपली भूमिका मांडली.



संसदेचे अधिवेशन सुरू असताना महाविकास आघाडीतील काही नेते उरणमध्ये दाखल होतात, टीका करतात. त्यांना काही काम राहिलेले नाही. पराभव समोर दिसत असताना काही नेते येत आहेत. त्यांना उरणमध्ये काहीतरी घबाड सापडल्याचा आरोप आमदार महेश बालदी यांनी केला. ते पुढे म्हणाले की, यापूर्वीही अनेक जणांनी उरणची वाट धरली होती, पण नंतर ते कुठेच दिसले नाहीत. अशा राजकीय वाऱ्यांना जनता ओळखते.

## मुंबई-गोवा महामार्ग होणार अतिक्रमणमुक्त; केंद्राची मोहीम

**पेण : प्रतिनिधी**

देशभरातील राष्ट्रीय महामार्ग अतिक्रमणमुक्त करण्यासाठी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने एक महत्त्वाकांक्षी पाऊल उचलले आहे. महामार्गावरील अवैध अतिक्रमणे हटवण्यासाठी १ डिसेंबरपासून महिनाभर विशेष मोहीम सुरू करण्यात आली आहे. या मोहिमेंतर्गत मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील अतिक्रमणेही हटविली जाणार आहेत.



मंत्रालयाचे सर्व प्रादेशिक अधिकारी, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, राष्ट्रीय महामार्ग आणि पायाभूत सुविधा विकास महामंडळ लि.च्या अधिकाऱ्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील पट्ट्यांची व्यापक तपासणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

मुंबई-गोवा महामार्गावरील पहिल्या टप्प्याचा विचार करता पळस्पेपासून इंदापूरपर्यंत अतिक्रमण झालेले आहे. पेण शहरानजीक भोगावती नदी सोडल्यानंतर दुतर्फा अतिक्रमण झाले आहे, तर कित्येक अंडरपासमध्ये टपऱ्या लावून अतिक्रमण केलेले आहे. या अंडरपासमध्ये पार्किंगसुद्धा केली जात आहे.

राष्ट्रीय महामार्ग (जमीन आणि वाहतूक नियंत्रण) अधिनियम २००२नुसार अतिक्रमणासाठी कठोर दंडाची तरतूद आहे. अतिक्रमित जमिनीच्या प्रति चौरस मीटर ५०० रुपयांपर्यंत किंवा जमिनीच्या खर्चाच्या समतुल्य दंड आकारला जाईल.

केंद्र शासनाच्या या अतिक्रमणविरोधी मोहिमेमुळे मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील अतिक्रमण हटविले जाऊन काम मार्गी लागण्यास मदत होणार आहे.

## ‘एमसीए’च्या स्पर्धेतील क्रिकेट सामन्यांना रायगडात प्रारंभ

### युवा नेते परेश ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या वतीने आयोजित १९ वर्षाखालील मुलांच्या आंतरजिल्हा निमंत्रित (इन्व्हिटेशन) क्रिकेट स्पर्धेला रायगड जिल्ह्यातील छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगण, शिवाजीनगर गव्हाण (पनवेल) येथे युवा नेते तथा पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत सोमवारी (दि. ८) शुभारंभ करण्यात आला.



या वेळी रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, उपाध्यक्ष राजेश पाटील, शिवाजीनगर क्रिकेट अकॅडमीचे अध्यक्ष अमित कडू, खजिनदार सुजित ठाकूर, सदस्य सुदेश ठाकूर, रोशन ठाकूर, सुमित झुंझारराव आदी उपस्थित होते. बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशन विरुद्ध दक्षिण विभाग या सामन्याचे आयोजन येथे करण्यात आले.

क्रिकेट बुक नियमांनुसार सुसज्ज, सर्व सुविधांनी युक्त तसेच हिरवाईने नटलेल्या या मैदानावर राज्यस्तरीय सामने आयोजित केल्याने परिसरातील क्रिकेटपटूंना उच्च दर्जाच्या क्रीडा संधी उपलब्ध होणार असल्याचे परेश ठाकूर यांनी स्वागतपर भाषणात नमूद केले तसेच जिल्ह्यात अनिरुद्ध पाटील यांच्या नेतृत्वाखाली लेदर बॉल क्रिकेटला नवसंजीवनी मिळत असल्याचे सांगून स्पर्धेतील सर्व संघांना शुभेच्छा दिल्या.

सामन्यांचे आयोजन नियोजनबद्ध करण्यात आले आहे. भविष्यात विविध वयोगटातील क्रिकेट स्पर्धांचे आयोजन रायगड जिल्ह्यात करणार असल्याचे ‘आरडीसीए’चे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील यांनी सांगितले.



## तुकडेबंदी कायद्यातील जाचक अटी शिथिल

**नागपूर :** तुकडेबंदी कायद्यातील जाचक अटी शिथिल करणारे विधेयक मंगळवारी (दि. ९) विधानसभेत मंजूर झाले. यामुळे सर्व जमीनधारकांची नावे सातबाऱ्यावर येतील आणि लहान भूखंडाची खरेदी विक्री सुलभ होईल, अशी माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. या नवीन विधेयकामुळे आता विकास आराखडा किंवा प्रादेशिक आराखडा मंजूर असलेल्या क्षेत्रात वेगळ्या ‘एनए’ परवानगीची गरज भासणार नाही. त्याऐवजी ‘एक वेळचे अधिमूल्य’ भरून ही प्रक्रिया पूर्ण करता येईल.



**पनवेल : जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीतील चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालयामधील ग्रंथपाल डॉ. रमाकांत अमर नवघरे यांना नुकतेच राज्यस्तरीय आदर्श ग्रंथपाल पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. याबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी डॉ. नवघरे यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी प्राचार्य एस.के. पाटील, ग्रंथालयीन कर्मचारी के.एन. कणेकर, श्री. गोंधळी उपस्थित होते.**

# बिबट्यांच्या हल्ल्याबाबत यंत्रणा सतर्क

## वनमंत्री गणेश नाईक यांची विधानसभेत माहिती

**नागपूर : प्रतिनिधी**

राज्यातील मानव वन्यजीव संघर्ष कमी करण्यासाठी वन विभागाकडून ठोस उपाययोजना करण्यात येत आहेत. भविष्यात एकही मनुष्य मृत्यूमुखी पडणार नाही, यासाठी यंत्रणा सतर्क केली आहे. यासंदर्भात लोकप्रतिनिधींची बैठक घेण्यात येणार असल्याची माहिती वनमंत्री गणेश नाईक यांनी विधानसभेत दिली.

राज्यातील बिबट्यांच्या हल्ल्यासंदर्भातील लक्षवेधीवर उत्तर देताना ते बोलत होते. यावेळी सदस्य डॉ. जितेंद्र आव्हाड, अतुल भातखळकर, सुनील प्रभु आदींनी ही लक्षवेधी सूचना मांडली होती.

वनमंत्री नाईक म्हणाले की, पुणे, अहिल्यानगर व नाशिक जिल्ह्यात बिबट्यांच्या संख्येत वाढ झाली आहे. बिबट्या हा प्राणी केंद्रीय वन्यजीव संरक्षण कायद्याच्या शेड्यूल एक मध्ये असल्याने कार्यवाही करण्यात मर्यादा आहेत. त्यामुळे बिबट्याचा समावेश शेड्यूल एकमधून शेड्यूल दोन मध्ये करण्याची विनंती केंद्र शासनाकडे केली आहे. त्याबरोबर केंद्रीय वन विभागाने राज्यातील पाच बिबट्यांच्या नसबंदीची परवानगी दिली असून याबाबतची कार्यवाही सुरू झाली आहे. सहा महिन्यात त्याचा अहवाल आल्यानंतर आणखी बिबट्यांच्या नसबंदीचा प्रस्ताव केंद्राकडे पाठविण्यात येईल.

पुणे जिल्ह्यात जुन्नर येथे बिबट्यांसाठी बचाव केंद्र सुरू करण्यात आले असून त्याची क्षमता वाढविण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत. याशिवाय अहिल्यानगर मध्येही बचाव केंद्र सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. पुणे जिल्ह्यात १२०० पिंजरे देण्यात आले असून नाशिक व अहिल्यानगरमध्येही पिंजरे देण्यात आले आहेत. भविष्यात आणखी पिंजरे वाढविण्यात येतील. तसेच लोकप्रतिनिधींनी मागणी केल्यास तातडीने पिंजरे पुरविण्याच्या सूचना विभागास देण्यात आले आहेत. तसेच बिबट्यांवर लक्ष ठेवून त्याच्या हालचालींची माहिती ग्रामस्थांना देण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून यंत्रणा उभी करण्यात आली आहे. बिबट्यांचा वावर असलेल्या परिसरातील शाळांची वेळ बदलण्यात आल्याची माहितीही मंत्री नाईक यांनी यावेळी दिली.

बिबट्यांचा वावर असलेल्या ठिकाणी गस्त घालण्यासाठी गृह, वन व महसूल विभागाची पथके तयार करण्यात आली आहेत. यामध्ये स्थानिक तरुणांना सहभागी करून घेण्याचा विचार करण्यात येत आहे. जंगलातच वन्य जीवांना खाद्य मिळावे, यासाठी प्रयत्न सुरू आहेत. जंगलाच्या सीमेवर बांबूचे कुंपण लावण्याचे नियोजन आहे. या प्रश्नांवर सर्व लोकप्रतिनीधी, वन व महसूल विभागाचे अधिकारी यांची संयुक्त बैठक घेऊन सर्व प्रश्न सोडविण्यात येतील, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

बिबट्याच्या हल्ल्यासंदर्भात अधिवेशन काळात लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांची महसूल विभागनिहाय बैठका घेऊन मार्ग काढण्याची विनंती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या वेळी केली. या चर्चेत सदस्य डॉ. जितेंद्र आव्हाड, नाना पटोले, शरद सोनवणे, अब्दुल सत्तार, कृष्णा खोपडे यांच्यासह विविध सदस्यांनी सहभाग घेतला.

# रायगडातील आठ कन्याशाळांचे 'सहशिक्षण'मध्ये रूपांतर

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

मुला-मुलींमधील लिंगभेदाची भावना मिटवण्याच्या दृष्टीने सरकारने महत्वाचे पाऊल उचलले आहे. यासाठी सरकारने कन्याशाळांचे सहशिक्षण शाळांमध्ये रूपांतर करण्याचा निर्णय घेतला आहे. रायगड जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या आठ कन्याशाळा असून, त्याचे सहशिक्षण शाळेत रूपांतर करण्याबाबत संबंधित गटशिक्षण अधिकाऱ्यांना सूचना करण्यात आली आहे. याबाबत कन्याशाळा व्यवस्थापनाबरोबर चर्चा करून सहशिक्षण शाळांमध्ये रूपांतर करायचे असल्यास तसा प्रस्ताव पाठवण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

राज्यात प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाबरोबरच माध्यमिक शाळांचा विकास व विस्तार मोठ्या प्रमाणात झालेला आहे. सुरुवातीपासूनच राज्यात स्त्री शिक्षणाला महत्त्व देण्यात आलेले आहे. माध्यमिक स्तरावरील शिक्षणाचा प्रसार मुलींमध्ये व्हावा म्हणून राज्य सरकारने सुरुवातीच्या काळात मुलींसाठी स्वतंत्र शाळा देण्याचे धोरण अवलंबले होते. त्यातून राज्यात अनेक कन्याशाळा उभारण्यात आल्या आहेत, मात्र कन्याशाळा सुरू झाल्यानंतर शालेय शिक्षणाच्या वयात मुलांमध्ये लिंगभेदाची भावना निर्माण होत असल्याचे लक्षात आले आहे. त्यामुळे असे होऊ नये व मुला-मुलींना एकत्रित शिक्षणाची संधी मिळून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची निकोप वाढ व्हावी या भूमिकेतून सहशिक्षणाच्या शाळा सुरू करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे.

**प्रस्ताव पाठवण्याच्या सूचना**

रायगड जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या आठ कन्याशाळा असून, त्याचे सहशिक्षण शाळेत रूपांतर करण्याबाबत संबंधित गटशिक्षण अधिकाऱ्यांना सूचना करण्यात आली आहे. याबाबत कन्याशाळा व्यवस्थापनाबरोबर चर्चा करून सहशिक्षण शाळांमध्ये रूपांतर करायचे असल्यास तसा प्रस्ताव पाठविण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत, अशी माहिती शिक्षण विभागाकडून देण्यात आली आहे.

**व्यक्तिमत्त्व विकास**

राज्य सरकारच्या अधिकृत निवेदनानुसार, सह-शिक्षण शैक्षणिक आणि अभ्यासेतर उपक्रमांमध्ये संतुलित सहभागाला प्रोत्साहन दिले जाणार आहे. सह-शैक्षणिक शाळांचे कामकाज काळाच्या अनुषंगाने चालते, ज्याचा उद्देश शालेय वयाच्या मुलांमध्ये लिंगभेद रोखणे आणि मुले आणि मुलींना एकत्र अभ्यास करण्याची आणि त्यांचे व्यक्तिमत्त्व विकसित करण्याची संधी मिळावी याची खात्री करणे आहे.

**रायगड जिल्हा परिषदेच्या कन्याशाळा**

- महाड – १
- सुधागड – १
- पोलादपूर १
- श्रीवर्धन – १
- पनवेल – १
- रोहा – १
- माणगाव – २

**आत्मविश्वासात वाढ**

पालकांना सर्वात मोठी चिंता असते ती मुलींच्या सुरक्षिततेची. नवीन धोरणानुसार शाळांमध्ये सुरक्षा व्यवस्था, सीसीटीव्ही आणि महिला स्टाफची उपस्थिती बंधनकारक असणार आहे. एकत्र शिक्षणामुळे मुले आणि मुली लहानपणापासूनच एकमेकांचा आदर आणि समानतेची भावना शिकतील. पालकांना मुलांच्या संवाद कौशल्यात आणि आत्मविश्वासात वाढ दिसेल.

# कर्जतमधील महिलांसाठी इनरव्हील क्लबचा खास उपक्रम



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जतच्या महिलांसाठी खास म्हणजे अंगणवाडी सेविका, आशा वर्कर्स आणि युनायटेड वे मुंबईच्या संपूर्ण स्टाफसाठी असंभव चित्रपटाचा एक खास, असा एकमेव शो आयोजित करून इनर व्हील क्लब ऑफ कर्जतच्या सदस्यांनी एक आगळीवेगळी कल्पना मांडली.

या उपक्रमामध्ये इनरव्हील क्लब ऑफ कर्जतच्या अध्यक्षा शिल्पा दगडे, उपाध्यक्ष मोनिका बडेकर, आयपीपी सरस्वती चौधरी, सचिव कश्यपी ठक्कर, कोषाध्यक्ष वैशाली मुसळे, आयएसओ संजीवनी घुमरे, संपादिका उज्वला पाटील, सदस्या उत्तरा वैद्य, वनिता सोनी, रूपा खणाल उपस्थित होत्या.

या चित्रपटाच्या निमित्ताने 'ऑरेंज वीक कॅम्पेन' हा उपक्रम राबवला, जो घरगुती हिंसाचाराविरुद्ध आवाज उठवण्याचा उपक्रम आहे. या महिलांच्या माध्यमातून समाजात हा संदेश देण्याचा प्रयत्न केला की घरगुती हिंसाचार कोणत्याही. परिस्थितीत स्वीकारायाच नाही. या उपक्रमाद्वारे या महिलांना संबंधित कायदे, संस्थात्मक मदत आणि वेगवेगळ्या महिला सुरक्षा पेशी यांची माहिती देऊन त्याबाबत सजग करण्याचाही प्रयत्न करणार आहोत.

सचित पाटील - अभिनेता, दिग्दर्शक, निर्माते आणि या चित्रपटाचा जीव - ज्यांनी झूम मिटिंगद्वारे सर्व महिलांशी मनमोकळा संवाद साधला आणि प्रत्येकाला खास असल्याची जाणीव करून दिली. तसेच घरगुती हिंसाचारावरील प्रभावी मार्गदर्शनपर व्याख्यान इनरव्हील क्लब ऑफ पनवेलच्या सदस्या ॲड. सुजाता चव्हाण यांनी केले.

# हर्षिता कदमला पुरस्कार

**पेण : रामप्रहर वृत्त**



बालपणापासूनच नृत्याची आवड असलेल्या आणि नृत्यातील लावणी या प्रकारावर अतोनात प्रेम असणाऱ्या पेण मधील १५ वर्षीय हर्षिता दीपक कदम या नृत्यांगणेला अनाथ सेवक सामाजिक कल्याण संस्था महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने वीर शिवछत्रपती महाराष्ट्र रत्न पुरस्कार २०२५ देऊन तिचा सन्मान करण्यात आला आहे.

संस्थेमार्फत दरवर्षी विविध क्षेत्रातील कार्य करणाऱ्या कर्तृत्वांचा आणि मानबिंदू स्थापन व्यतिमत्व असणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करण्यात येतो. राज्यातील या सन्मानित व्यक्तींमध्ये पेण मधील अवघ्या १५ वर्षीय लावणी नृत्यांगणा हर्षिता हिची निवड करून तिचा सन्मान केल्याने हर्षिताने सांस्कृतिक क्षेत्राद्वारे पेणचे नाव राज्यस्तरावर झळकाविल्याने तिचे सर्वच स्तरातून अभिनंदन होत आहे. याबाबत हर्षिताला विचारले असता लावणी ही एक आपली जुनी सांस्कृतिक परंपरा आहे आणि ती पुढे अविरतपणे जपून ठेवणे हे आमच्यासारख्या कलाकारांचे काम आहे आणि मी ते शेवटपर्यंत जतन करून ठेवणार असल्याचे तिने सांगितले.

# अलिबागमध्ये २२ डिसेंबरला डाक अदालत

**रायगड : रामप्रहर वृत्त**

अधिक्षक डाकघर रायगड विभाग अलिबाग यांच्या कार्यालयाद्वारे २२ डिसेंबर २०२५ रोजी, सकाळी ११ वाजता डाक अदालत आयोजित करण्यात आली आहे. या डाक अदालतीमध्ये नवी मुंबई रिजन विभागातील डाक सेवेसंबंधीत तक्रार/समस्या ज्यांचे निवारण ६ आठवडा कालावधीत झालेले नाही, अशा टपाल, स्पीडपोस्ट, काऊटर सेवा, बचत बँक, मनीऑर्डर संबधित तक्रारी विचारात घेतल्या जातील.

तक्रारीत सविस्तर माहिती जसे दिनांक, ज्या अधिकाऱ्याकडे मूळ तक्रार दाखल केली त्या अधिकाऱ्याचे नाव व हुद्दा इ. असणे आवश्यक आहे.

इच्छुक ग्राहकांनी आपली तक्रार २ प्रतीत अधिक्षक डाकघर रायगड विभाग अलिबाग ता.अलिबाग, जि.रायगड यांच्याकडे १८ डिसेंबर २०२५ पर्यंत पोहचेल अशारितीने पाठवावी.

# शेतीमध्ये यांत्रिकीकरणाचा स्वीकार अपरिहार्य -अनिल पाटील

**धाटाव : प्रतिनिधी**



रोहा तालुका शेतकरी विकास प्रतिष्ठानचा काम अत्यंत प्रेरणादायी आहे. अनेक तरुण प्रगतशील शेतकऱ्यांचा सहभाग जाणवला. आता हवामानानुसार शेतीत बदल करणे गरजेचे आहे. नियोजन अत्यंत महत्वाचे आहे. शेतीत कायम अडचणी राहणार, अडचणी येतात तेव्हाच उत्तम संधी असते. शेतीत अधिक फायद्यासाठी यांत्रिकीकरणाचा स्विकार अपरिहार्य झाले आहे. मुख्यतः भातशेती करण्याच्या पद्धती बदला, फळबागा योजनेसाठी न लावता भविष्यासाठी लावा, गट शेती करा, नैसर्गिक, सेंद्रिय शेतीकडे वळणे क्रमप्राप्त आहे असे मौलिक विचार कृषिरत्न अनिल पाटील यांनी व्यक्त केले. ते रोहा येथे आयोजित शेतकरी मार्गदर्शन कार्यक्रमात बोलत होते.

रोहा तालुका शेतकरी विकास प्रतिष्ठानचा ९वा वर्धापन दिन, कृषी दिनदर्शिका प्रकाशन, शेतकरी सन्मान कार्यक्रमात ते बोलत होते. व्यासपीठावर तालुका कृषी अधिकारी महादेव करे, कृषी विज्ञान केंद्राचे डॉ.मनोज तलाठी, पंचायत समिती कृषी अधिकारी रणजीत लवाटे, प्रगतशील शेतकरी किरण लेले, कोंडू पाष्टे, प्रतिष्ठानचे अध्यक्ष गणेश भगत व विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. प्रारंभी कृषीरत्न अनिल पाटील यांच्या शुभहस्ते दिनदर्शिका २०२६ चे प्रकाशन, तालुक्यातील प्रगतशील शेतकऱ्यांचा सन्मान करण्यात आला.

यात राजेंद्र वरणकर, महादेव शिंगाडे, प्रमोद म्हात्रे, विनायक धामणे, विजय पाटील, लक्ष्मण जाधव, नितेश घोसाळकर, रामदास मोहिते यांसह सामूहिक शेती युवा कृषी उद्योग निवी गटाचा सन्मान करण्यात आला. प्रास्ताविकात गणेश भगत यांनी आम्ही शेतकरी विकास प्रतिष्ठानच्या वतीने एक चळवळ उभी केली, त्यात विविध प्रकारची शेती करणारे शेतकरी आहेत. विविध शासकीय योजना, शेतकऱ्यांना मार्गदर्शन उपक्रम राबवून समाजात शेतीची आवड निर्माण करीत आलोत, आज ९वा वर्धापन दिन साजरा होणारा आनंद द्विगुणीय झाला. भविष्यात अजून काम करायचे आहे असे भगत यांनी सांगितले.

कृषिरत्न अनिल पाटील हे शेती क्षेत्रातला चालता बोलता विद्यापीठ आहे. त्यांचे अनुभवाचे बोल शेती व शेतकऱ्यांसाठी मोलाचे आहे. स्वतःच्या आरोग्यासोबत जमिनीची काळजी घेणे महत्त्वाचे आहे असे सांगत डॉ मनोज तलाठी यांनी कृषी विज्ञान केंद्राच्या अनेक योजनांची माहिती शेतकऱ्यांना दिली. शासनाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा असे आवाहन पंचायत समिती कृषी अधिकारी रणजीत लवटे यांनी केली.

या वेळी प्रगतशील शेतकरी किरण लेले, कोंडू पाष्टे यांनीही शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन संतोष दिवकर यांनी केले तर आभार मार्गदर्शन रघुनाथ कडू यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष गणेश भगत यांच्या मार्गदर्शनाखाली उपाध्यक्ष अनंत मगर, प्रशांत धामणसे, रमेश पाटील, नितीन पिंपळे, धनंजय जोशी, हसन म्हसलाई, खेळू थिटे, भाऊ डिके, विनोद पाटील, संतोष दिवकर व पदाधिकाऱ्यांनी विशेष मेहनत घेतली. दरम्यान, रोहा तालुका शेतकरी विकास प्रतिष्ठानच्या वर्धापन दिनानिमित्त विविध क्षेत्रातील मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या.

# लायन्स क्लबतर्फे आरोग्य शिबिर

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

लायन्स क्लब खालापूर व श्री बापूजी वारकरी संप्रदाय ग्रामस्थ मंडळ तुकसई यांच्या संयुक्त विद्यमाने व मेडिकव्हर हॉस्पिटल खारघर यांच्या सहकार्यातून तुकसई- खालापूर रायगड येथे अखंड हरीनाम साप्ताहमध्ये महाआरोग्य शिबीर राबविण्यात आले.सदर शिबिरात शुगर मधुमेह १०० रुग्णांनी लाभ घेतला.

ब्लड प्रेशर १०० रुग्ण ईसीजी तपासणी २० रुग्ण, डोळे तपासणी १२५ रुग्ण, मोफत चष्मे वाटप ५०, रक्तदान १५ नागरिकांनी केले. या वेळी लायन्स क्लब खालापूर अध्यक्ष किशोर पाटील, अध्यक्षा शिवानी जंगम, लहू भोईर, हभप रामदासमहाराज पाटील, हभप ज्ञानेश्वरमहाराज पाटील, हभप रामदास उतेकर, अजित पांगारे आदी उपस्थित होते.




# गेल इंडिया कंपनीतर्फे खानावमध्ये विकासात्मक सुविधा

**रेवदंडा : प्रतिनिधी**

गेल (इंडिया) लिमिटेड कंपनीने रायगड जिल्ह्यात अलिबाग तालुक्यातील उसर येथे प्रोपेन डिहायड्रोजेनेशन पॉलीप्रोपायलीन (पीडीएच-पीपी) प्रकल्पांतर्गत प्रकल्पाच्या परिसरातील आसपासचे गावांच्या विकासासाठी कॉर्पोरेट पर्यावरण दायित्वाच्या (सीईआर) अंतर्गत अनेक सार्वजनिक विकासात्मक कामे हाती घेतली आहेत.

गेल-उसर प्रकल्पाचे आसपासच्या ग्रामपंचायती व अन्य संस्थांमार्फत आजपर्यंत रु.१४.०२ कोटींची विकास कामे मंजूर करण्यात आली आहेत. त्यापैकी आजपर्यंत रु.३.७३ कोटींची कामे पूर्ण करण्यात आली असून उर्वरित सार्वजनिक विकासात्मक कामे चालू असून ती लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबतची कार्यवाही चालू आहे. सद्यस्थितित ग्रुप ग्रामपंचायत, खानाव यांचे अंतर्गत येणाऱ्या गावांमध्ये गेल कंपनीचे सीईआर फंडातून पेव्हर ब्लॉक चे रस्त्यांसाठी रु. ३५ लाख, प्राथामिक शाळा, उसर चे सुशोभिकरणासाठी रु. १० लाख आणि उसर, मुळखानाव, कुणे, वेलवली, भेरसे, वेलतवाडी, भादाणे व वनवली या गावांमध्ये सौर उर्जेवर आधारित पाणीपुरवठा करणेसाठी सोलार पॅनलकरिता एकूण रु. ४० लाख इतक्या रकमेची कामे पूर्ण झालेली आहेत. त्याचाच एक भाग म्हणून आज उसर, मुळखानाव, कुणे, वेलवली, भेरसे, वेलतवाडी, भादाणे व वनवली या गावांमध्ये सौर उर्जेवर आधारित पाणीपुरवठा करणेसाठीचे सोलार पॅनलचे त्यांचे उद्घाटन ९ डिसेंबर २०२५ रोजी गेल (इंडिया) लिमिटेड, उसर कंपनीचे कार्यकारी निदेशक तथा प्रभारी अधिकारी अनूप गुप्ता यांचे हस्ते करण्यात आले.

या वेळी गेल (इंडिया) लिमिटेड, उसर कंपनीचे मानव संसाधन विभागाचे महाप्रबंधक जितिन सक्सेना अन्य वरिष्ठ अधिकारी तसेच ग्रामपंचायतीचे सरपंच, पंचायतीचे सदस्य, वेलवली व आसपासचे गावांतील बहुसंख्य नागरिक उपस्थित होते.



# तटकरे महाविद्यालयात हिंदी साहित्याविषयक राष्ट्रीय परिषद

**माणगाव : बातमीदार, प्रतिनिधी**

द.ग. तटकरे महाविद्यालय, माणगाव येथे आधुनिक हिंदी साहित्याच्या प्रवाहातील मूल्यपरंपरा, सामाजिक परिवर्तन आणि नव्या आव्हानांचा वेध घेणारी राष्ट्रीय परिषद १३ डिसेंबर रोजी आयोजित करण्यात आली आहे. प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान (भारत सरकार), महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमी, मुंबई आणि माणगाव शिक्षण प्रसारक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने ही परिषद होत आहे.

परिषदेच्या उद्घाटन सत्राला डॉ. शीतला प्रसाद दुबे (माजी अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमी), डॉ. अनिल सिंह (अधिष्ठाता, मानवविज्ञान विभाग, मुंबई विद्यापीठ) आणि डॉ. संतोष मोटवानी (अध्यक्ष, हिंदी अध्ययन मंडळ, मुंबई विद्यापीठ) आदी राष्ट्रीय ख्यातीचे विद्वान उपस्थित राहणार आहेत.

याशिवाय माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे, सचिव कृष्णा गांधी यांच्यासह हिंदी विषयातील तज्ज्ञ प्रा. बाळासाहेब कोकाटे, प्रा. अनिल काळे, प्रा. सुभाष जाधव, प्रा. मोहसिन खान, प्रा. विद्या शिंदे, प्रा. सुभाष पवार, प्रा. ईश्वर पवार, प्रा. युवराज मुळे, डॉ. देवीदास बामणे, डॉ. के.के. शर्मा, डॉ. वंदन जाधव, प्रा.आर. गोपाळकृष्णन, डॉ. एस.ए. मंजुनाथ यांची उपस्थिती लाभणार आहे.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्राचार्य डॉ. बी.एम. खामकर, हिंदी साहित्य अकादमीचे सहसंचालक व सदस्य सचिव सचिन निंबाळकर तसेच परिषद संयोजक व हिंदी विभागप्रमुख डॉ. जे.आर. पांडेय यांनी सर्व साहित्यप्रेमी, विद्यार्थी, संशोधक आणि अभ्यासकांना सहभागाचे आवाहन केले आहे.

# ॲबिलिटी मेळाव्यात दिव्यांगांच्या क्षमतांचे प्रदर्शन



**नवी मुंबई : बातमीदार**

दिव्यांग जनजागृती सप्ताहाच्या निमित्ताने राष्ट्रीय बौद्धिक दिव्यांगजन सशक्तीकरण संस्था, प्रादेशिक केंद्र नवी मुंबई यांच्या वतीने शुक्रवारी (दि.५) एबिलिटी मेळावा अत्यंत उत्साहात आणि दिमाखात आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश दिव्यांग व्यक्तींमध्ये असलेल्या विविध कौशल्यांना व्यासपीठ देणे, त्यांची क्षमता समाजासमोर मांडणे आणि सर्वसमावेशकतेचा संदेश दृढ करणे हा होता. हा कार्यक्रम संस्थेचे प्रभारी अधिकारी डॉ. रवी प्रकाश सिंह यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला होता. मेळाव्यात एकूण ३० स्टॉल्स उभारण्यात आले होते, ज्यामध्ये दिव्यांग व्यक्तींनी तयार केलेले हस्तकला साहित्य, खाद्यपदार्थ, कला-कौशल्य निर्मिती तसेच लघुउद्योगाशी संबंधित उत्पादने ठेवण्यात आली होती. याशिवाय लाईव्ह स्केचिंग, सेन्सरी ओरिएंटेशन, फन गेम्स अशा विविध उपक्रमांमुळे कार्यक्रमाला आलेल्या पाहुण्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

दिव्यांग व्यक्तींसाठी रोजगार नोंदणीची सुविधा उपलब्ध करवून देण्यात आली होती, ज्यामुळे त्यांना संभाव्य नियोक्त्यांशी थेट संपर्क साधण्याची संधी मिळाली. तसेच ११ स्वयंसेवी संस्था आणि स्व-रोजगार करणाऱ्या दिव्यांग व्यक्तींनी आपली कला, उद्योजकता आणि उत्पादने सादर करून कार्यक्रमाचे आकर्षण वाढवले.

या भव्य मेळाव्यास एकूण ८२० सहभागी उपस्थित होते, ज्यामध्ये १७७ दिव्यांग व्यक्ती, २२० एस्कॉर्ट्स, राष्ट्रीय बौद्धिक दिव्यांगजन संस्थेचे कर्मचारी आणि विद्यार्थी-शिक्षक, तसेच भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ नर्सिंग, वायएमटी डेंटल कॉलेज, वायएमटी फिजिओथेरपी कॉलेज, एनएसएस आणि सरस्वती इंजिनिअरिंग कॉलेज यांसारख्या विविध संस्थांमधील विद्यार्थी आणि प्रतिनिधी यांचा सहभाग होता. कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथींमध्ये डॉ. एझिलमाथी (प्राचार्या, वायएमटी कॉलेज ऑफ फिजिओथेरपी), डॉ. रमेश एन. (उपप्राचार्य, वायएमटी कॉलेज ऑफ फिजिओथेरपी), दीपक नवगरे (प्राचार्य, नवी मुंबई महानगरपालिका ईटीसी केंद्र, वाशी), डॉ. अरुणिमा श्रीलथा (सह-प्राध्यापक, भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ नर्सिंग), मिस भावना गुप्ता आणि मिस श्यामला सुरेश (लायन्स क्लब), मिस्टर ऋषभ , डॉ. रमणी (करिअर काउन्सेलर, प्रफुल्ता, डॉन बॉस्को स्कूल, नेरुळ) आणि सुनीत मारवाह (व्यवसाय प्रशिक्षक आणि ट्रस्टी, स्वामी ब्रह्मानंद प्रतिष्ठान) यांचा समावेश होता. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष प्रेरणादायी आणि उत्साहवर्धक रूप प्राप्त झाले.

## निवडक

### शिडीवरून घसरुन एकाचा मृत्यू

**मोहोपाडा :** रसायनीतील लाडिवली गावात भाड्याने राहणाऱ्या संतोष करणं वढीया (वय ३०) हा मद्याच्या नशेत खोलीच्या पोटमाळ्यावरुन अगर लाकडी शिडी वरुन पाय घसरुन खाली पडल्याने त्याच्या डोक्याच्या मागील बाजूस दुखापत झाल्याने त्यास औषधोपचारासाठी चौक ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले.परंतु डॉक्टरांनी तपासून त्यास मयत घोषित केले. याप्रकरणी रसायनी पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यु बिएनएसएस १९४ प्रमाणे नोंद झाली असून वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक माळी तपास करीत आहेत.

### घरफोडीत लाखोंचा ऐवज लंपास

**पनवेल :** करंजाडे वसाहतीमध्ये एका घरातून चोरांनी तब्बल दीड लाखांचे सोन्याचे दागिने लंपास केले. ही मध्यरात्रीच्या सुमारास घडली. करंजाडे येथील आर पॉकेट १ येथील शाम नाईक यांच्या इमारतीमधील एका सदनिकेत ही घरफोडीची घटना घडली. रात्री नऊ वाजल्यापासून पहाटेदरम्यान ही चोरी झाली. चोरांनी रिंगा, चार बांगड्या आणि अंगठी असे दागिने चोरले. याबाबत पनवेल शहर पोलीस चोरट्यांचा शोध घेत आहेत.

### करंजाडेतून तरुण बेपत्ता

**पनवेल :** करंजाडे येथील राहत्या घरातून एक तरुण कोणास काही एक न सांगता निघून गेल्याने तो हरवल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल



करण्यात आली आहे. प्रणित प्रदिप शिंदे (वय २५ वर्षे, रा. अनंत सोसायटी, सेक्टर- आर ४, करंजाडे) असून त्याची उंची ८ इंच अंदाजे, बांधा मध्यम, रंग-२४८ सावळा, चेहरा-गोल, केस-काळे जाड वाढलेले नाक मोठे बसके, अंगात गुलाबी टी शर्ट, मिलीटरी रंगाची पॅन्ट, सोबत मोबाईल नेलेला नाही तसेच भाषा मराठी, हिंदी भाषा बोलता येथे. याबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे, नवी मुंबई ८६५५३५४१११ वर किंवा तपासी अमंलदार एस.आर. जाधव ८०९७१७८०६६ किंवा प्रदिप शिंदे, ८६६८४८१६६८ वर संपर्क साधवा, असे आवाहन करण्यात आला आहे.

# वासांबे ग्रामपंचायतीकडून थकीत घरपट्टी, पाणीपट्टीवर ५० टक्के सूट

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील सर्वाधिक लोकसंख्या असणाऱ्या ग्रुप ग्रामपंचायत वासांबे मोहोपाडा या ग्रामपंचायतीने सरपंच, उपसरपंच व सदस्यांनी ठराव घेवून थकित घरपट्टी व पाणीपट्टीवर ग्रामस्थांना ५० टक्के सुट देण्याचा ठराव मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान अंतर्गत ग्रामसभेत संमत केला.



उपरोक्त पार्श्वभमीवर महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ आणि त्याखालील नियम या अन्वये प्राप्त ग्रामपंचायतींमधील ज्या निवासी मालमत्ताधरकांनी मालमत्ता कर, पाणीपट्टी आणि दिवाबत्ती कर इत्यादी करांच्या (सन २०२५-२०२६ या) चालू वर्षाच्या पूर्ण रकमेसह, १ एप्रिल २०२५ पूर्वीच्या एकूण थकबाकीच्या ५० टक्के रक्कम मुख्यमंत्री समृध्द पंचायत राज अभियान अंमलबाजवणीच्या कालावधीत एक रकमी ग्रामपंचायतीकडे जमा केल्यास एकूण मूळ थकबाकीच्या रकमेस ५० टक्के सवलत राहील. (म्हणजेच सन २०२५-२०२६ च्या पूर्ण करांची रक्कम + दिनांक १ एप्रिल २०२५ पूर्वीच्या करांची एकूण थकबाकी मिळून येणाऱ्या रकमेचा ५० टक्के रक्कम) सदर सवलत केवळ निवासी मालमत्ताधारकांसाठी असून औद्योगिक, वाणिज्यिक व इतर मालमत्तांसाठी नाही. ही सवलत उक्त नमूद अभियान कालावधीसाठी लागू राहील. ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रातील निवासी मालमत्ता धारकांना, निवासी मालमत्ता धारकांना, निवासी मालमत्ता कर, पाणीपट्टी आणि दिवाबत्ती कर इत्यादी करांच्या थकबाकीत वरीलप्रमाणे सवलत देण्याचा निर्णय घेण्यात आला.

प्रत्येक ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील थकबाकीचे प्रमाण आणि संबंधित ग्रामपंचायतीची आर्थिक गरज लक्षात घेवून निवासी मालमत्ताधारकांना १ एप्रिल २०२५ पूर्वीच्या एकूण निवासी मालमत्ता कर, पाणीपट्टी आणि दिवाबत्ती कर इत्यादी करांच्या थकबाकीमध्ये ५० टक्के सुट ३१ डिसेंबर २०२५पर्यंत असणार आहे.

दरम्यान, वासांबे मोहोपाडा ग्रुप ग्रामपंचायतीने थकित घरपट्टी, पाणीपट्टी धारकांना ३१ डिसेंबर अखेर ५० टक्के सुट जाहिर केल्याने ग्रामपंचायत सरपंच उमाताई संदिप मुंढे, उपसरपंच, सर्व सदस्य आणि ग्रामपंचायत अधिकारी वैभव पाटील यांचे आभार मानले जात आहे.

**पनवेल महापालिकेकडून निवडणुकीसाठी तयारी**

# प्रारूप मतदार यादीवरील हरकती व सूचनांवर कार्यवाही

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य निवडणूक आयोगाने पुरविलेल्या सार्वत्रिक निवडणूक २०२५ प्रारूप मतदार यादीवर आलेल्या हरकती व सूचना यांवर कार्यवाही करण्यासाठी महापालिका आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली युध्दपातळीवर काम करते आहे. या कामासाठी महापालिकेने प्रभाग निहाय नियंत्रण अधिकाऱ्यांची नेमणूक केली असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक नियंत्रण अधिकाऱ्यांची निवड करण्यात आली आहे.

हरकती व सूचना यांची प्रत्यक्ष स्थानिक पातळीवर पडताळणी करून सदर हरकतींवर चौकशी अहवालानुसार निर्णय घेतला जात आहे. हे काम लवकरात लवकर पार पाडण्यासाठी महानगरपालिका प्रशासन पूर्ण क्षमतेने कार्यरत असून शनिवार रविवारी या सुट्ट्यांच्या दिवशीही कार्यालये सुरू ठेऊन कामकाज करण्यात आले.

प्रारूप मतदार यादीवरती महापालिकेकडे सुमारे २९ हजार ४२३ हरकती प्राप्त झाल्या असून यातील बहुतांश हरकती या दुबार मतदारांबाबत आहेत. सदर दुबार मतदारांबाबत राज्य निवडणूक आयोगाच्या २९ ऑक्टोबर २०२५ सूचनांनूसार बीएलओंच्या मार्फत समक्ष चौकशी करून कार्यवाही करण्यात येत आहे. प्रारूप मतदार यादीवरील हरकतींवर केलेल्या कार्यवाहीनुसार अंतिम मतदार याद्या दिनांक १० डिसेंबर २०२५ रोजी प्रसिध्द करण्यात येतील अशी माहिती निवडणूक विभागाचे उपायुक्त नानासाहेब कामठे यांनी दिली आहे.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात हायपरटेंशन जनजागृतीपर शिबिर

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात मंगळवारी (दि.९) विद्यार्थी परिषद आणि विद्यार्थी कल्याण समितीच्या संयुक्त विद्यमाने सर्व शाखेतील प्रथम व द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी हायपरटेंशन जनजागृतीपर शिबिराचे आयोजन केले होते.

या शिबिरामध्ये डॉ. निलेश यांनी विद्यार्थ्यांना हायपरटेन्शन म्हणजेच उच्च रक्तदाब या आजाराची लक्षणे, कारणे, याचे परिणाम आणि यावर घेता येणारी योग्य काळजी याबद्दल समजावून सांगितले व जीवनशैलीतील बदल, आहारातील सुधारणा, नियमित व्यायाम आणि तणाव नियंत्रण यांचे महत्त्वही त्यांनी स्पष्ट केले त्यांच्या या मार्गदर्शनामुळे त्यांना हायपरटेन्शनचा धोका कसा कमी करता येईल आणि आरोग्य कसे जपावे हे समजले.

महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांच्या मार्गदर्शनात हा उपक्रम यशस्वीरित्या घेण्यात आला. या शिबिराचे आयोजन प्रा. डॉ. प्रवर शर्मा आणि प्रा. विशाल देशमुख यांनी केले तसेच दोन्ही समितीतील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.





**पनवेल : तालुक्यातील रामबाग उद्यानाचा येत्या २२ डिसेंबर रोजी वर्धापन दिन आहे. त्यानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या उपस्थित बैठक आयोजित करण्यात आली होती. दरम्यान, रामबाग पहायला आयर्लंड देशातून काही पर्यटक आले होते. त्यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट घेतली. या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी देशमुख, न्हावा ग्रामपंचायतीचे सरपंच विजेंद्र पाटील, चंद्रकांत भोईर, हरेश्वर म्हात्रे, अरुणशेठ ठाकूर, सागर ठाकूर, नरेश मोकल, सी.एल ठाकूर, सुभाष कडू, मदन ठाकूर, सदाशिव ठाकूर, निलेश खारकर, शैलेश भगत, धीरज ओवळेकर यांच्यासह रामबाग व्यवस्थापन कमिटी व म्हसेश्वर मंदिर कमिटीचे सदस्य उपस्थित होते.**

# रिटघर विद्यालयात विज्ञान प्रदर्शन; विद्यार्थ्यांचा सहभाग

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री भैरवदेव विद्यालय व लोकनेते रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय येथे मंगळवारी (दि.९) शालेयस्तरीय विज्ञान प्रदर्शन साजरा करण्यात आले.

विद्यालयाचे स्थानिक स्कूल कमिटीचे सदस्य विलास भोपी व गणू भोपी, विद्यालयाचे मुख्याध्यापक कारंडे सर यांच्या हस्ते डॉ.सी.व्ही.रमन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या विज्ञान प्रदर्शनात पाचवी ते दहावी अखेर विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्तपणे सहभाग घेतला. या विद्यार्थ्यांनी विज्ञानातील उपकरणे मॉडेल, वैज्ञानिक खेळणी, गणितीय उपकरणे तयार केली होती.



या प्रदर्शनात पाचवी ते सातवी लहान गटात यश हनुमान पाटील प्रथम, वेदिका वेदांत चौधरी द्वितीय, कनिष्का पांडुरंग पाटील तृतीय यांनी तयार केलेले उपकरण व गणित मॉडेल यांना वरील क्रमांक देण्यात आले. तर आठवी ते दहावी मोठ्या गटात ओमकार ज्ञानेश्वर शेळके प्रथम, संचिता विजय संकपाळ द्वितीय, आर्यन आनंदा पार्टे तृतीय यांनी तयार केलेले उपकरण व गणित मॉडेल यांना वरील क्रमांक देण्यात आले.

विज्ञान प्रदर्शनात भाग घेतलेल्या सर्व विद्यार्थ्याचे शाळेचे मुख्याध्यापक व स्कूल कमिटी सदस्य यांनी विद्यार्थ्यांनी तयार केलेले मॉडेल प्रतिकृती यांचे अवलोकन करून विद्यार्थ्याचे कौतुक केले.

सर्व विद्यार्थ्यांनी विज्ञान प्रदर्शन पाहण्याचा आनंद घेतला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एस.व्ही. पाटील यांनी केले. तसेच या विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन एम.बी जाधव व एस.एस. पाटील यांनी केले.

# गव्हाण हायस्कूलमध्ये वार्षिक क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन

**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे गव्हाण येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेज, गव्हाण-कोपर येथे ९, १० व ११ डिसेंबर २०२५ अशा तीन दिवसीय वार्षिक क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवारी (दि.९) क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन झाले.

या वेळी गव्हाण ग्रामपंचायतीच्या माजी सरपंच,पनवेल पंचायत समितीच्या माजी सदस्य रत्नप्रभा घरत, विद्यालयाच्या स्थानिक स्कूल कमिटीचे ज्येष्ठ सदस्य अनंता ठाकूर, जेष्ठ सदस्य विश्वनाथ कोळी, गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजय घरत,ज्येष्ठ कार्यकर्ते जयवंत देशमुख, ॲड. योगिता भगत, आशाताई म्हात्रे, वैभव घरत, सुधीर ठाकूर, किशोर पाटील आदी मान्यवरांच्या उपस्थितीत क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन झाले.



या वेळी विद्यालयाच्या प्राचार्या व रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या ज्योत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर रवींद्र भोईर, लाईफ वर्कर देवेंद्र म्हात्रे, ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख प्रा. संजय उगले, जेष्ठ शिक्षक प्रा.आर. एन.चौधरी आणि सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

राष्ट्रगीत, प्रतिमापूजन झाल्यानंतर मान्यवरांच्या शुभहस्ते क्रीडा ज्योत प्रज्वलित करण्यात आली. यानंतर सर्व विद्यार्थ्यांना खेळाडूची शपथ देण्यात आली. स्मित मोकल याने खेळाडूची शपथ दिली. मान्यवरांच्या स्वागत सोहळ्यानंतर विद्यालयाच्या प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर यांनी आपल्या प्रास्ताविकात विद्यालयाने शासकीय क्रीडा स्पर्धेत केलेल्या यशस्वी कामगिरीचा आलेख मान्यवरांना सांगत क्रीडा महोत्सवाची माहिती दिली. ॲड. योगिता भगत आणि कार्यक्रमाच्या अध्यक्षा रत्नप्रभा घरत यांनी आपल्या मनोगतात विद्यालयाच्या सहशालेय उपक्रमांचे कौतुक करत क्रीडा महोत्सवाला आणि खेळात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

यानंतर सर्व मान्यवरांच्या उपस्थित इ. नववी ब आणि क वर्गाचा कबड्डीचा पहिला सामना खेळविण्यात आला. सर्व मान्यवरांनी दोन्ही संघाच्या खेळाडूंना हस्तांदोलन करून शुभेच्छा दिल्या. पहिल्या दिवशी मुलांचे कबड्डीचे सामने आणि मुलींचे खो- खो चे सामने खेळविण्यात आले.

या तीन दिवसीय क्रीडा महोत्सवात पहिल्या दोन दिवसांत सांघिक खेळ आणि तिसऱ्या दिवशी वैयक्तिक खेळ आयोजित करण्यात आले आहेत. पहिल्या दिवशी उद्घाटन सोहळ्यानंतर कबड्डी आणि खो खो चे सामने यशस्वीरीत्या संपन्न झाले. पुढचे दोन दिवस या क्रीडा महोत्सवाची रंगत अधिक वाढणार आहे.



**पनवेल : रयत शिक्षण संस्थेच्या कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमधील अर्चित अनिल दीक्षित याने इंडोरन्स वर्ल्ड चॅम्पियनशिपमध्ये बाजी मारून स्पर्धेत १४ वर्ष वयोगटात दोन कांस्यपदके पटकावली आहेत. याबद्दल संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आर्चित दीक्षितचे अभिनंदन करून त्याचे कौतुक केले. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचे प्राचार्य अविनाश कुलकर्णी तसेच अर्चितचे आई-वडील उपस्थित होते. या स्पर्धेत यूएई, मालदीव, केनिया, बांगलादेश, नेपाळ, फिलिपाइन्स, सौदी अरेबिया, म्यानमार, श्रीलंका, थायलंडसह भारतातील स्पर्धकांचा सहभाग होता. यामध्ये अर्चितने दमदार कामगिरी केली आणि भारतासाठी दोन कांस्यपदके जिंकली.**



**पनवेल : महाराष्ट्र पॉवर लिफ्टिंग असोसिएशनच्या वतीने रायगड जिल्ह्यात पॉवर लिफ्टिंग खेळाच्या विकासासाठी आदित्य अनंत घरत यांनी दाखवलेली निष्ठा आणि समर्पण लक्षात घेऊन त्यांची रायगड जिल्हा पॉवरलिफ्टिंग फेडरेशनच्या सचिवपदी नियुक्ती करण्यात आली आहे. याबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आदित्य घरत यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपच्या उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस चारुशीला घरत, अनंत घरत, सीमा घरत यांच्यासह इतर उपस्थित होते.**

# उरणचा जलतरणपटू मयंक म्हात्रेचा नवा विक्रम

**उरण : बातमीदार, प्रतिनिधी**

उरणचा १२ वर्षीय मयंक म्हात्रे याने भाऊचा धाक्का ते करंजा जेट्टी हे २४ किमी अंतर पोहुन पार करत नवा विक्रम स्थापित केला आहे. मयंक भाऊचा धक्का ते करंजा जेट्टी पोहून पार करणारा पहिला जलतरणपटू ठरला आहे. याआधी त्याने धरमतर ते करंजा आणि घारापुरी ते करंजा हे प्रवाह पोहून पार केले आहेत. तर त्याने पोहून पार केलेले तिनही प्रवाह प्रथम पोहून पार करण्याचा नोंद मयंकच्या नावाने झाली आहे.



उरण सेंटमेरीज कॉन्व्हेन्ट स्कुलमध्ये इयत्ता सातवीमध्ये शिकणाऱ्या मयंक दिनेश म्हात्रे याने नवा विक्रम स्थापित केला आहे. भाऊचा धक्का ते करंजा जेट्टी हे २४ किमी अंतर त्याने ७ तास २१ मिनिटे ६ सेकंद या वेळेत पार करून आपल्या विक्रमची नवी नोंद केली आहे. मयंक भाऊचा धक्का ते करंजा जेट्टी पोहून पार करणारा पहिला जलतरणपटू ठरला आहे. महत्वाचे म्हणजे मयंकने याआधी धरमतर ते करंजा जेट्टी हे १८ किमी अंतर पोहून पार केले. हा प्रवाह पोहून पार करणारा तो पहिला जलतरणपटू होता. तर घारापुरी ते करंजा जेट्टी हे १८ कमी अंतर पोहून पार करणारा देखील तो पहिला जलतरणपटू ठरला. सलग तीन वर्षे मयंकने तीन समुद्रीय प्रवाह पोहून ओर केल्याने तो या तीनही प्रवाह पार करणारा पहिला जलतरणपटू ठरला आहे.

पहाटेचा काळोख, गार हवा, पान्याच्या लाटा त्यातच मोठमोठ्या बोटींचा येणारा अडथळा यातून मार्ग काढत त्याने निर्धारीत वेळेत विक्रम पूर्ण केला आहे. त्याने केलेल्या या विक्रमची नोंद महाराष्ट्र राज्य हौशी जलतरण संघटनेने दखल घेत त्याच्या विक्रमची नोंद केली आहे. तर करंजा जेट्टी येथे विक्रम पूर्ण होताच करंजा ग्रामस्थांनी त्याचे जल्लोषत स्वागतं करत त्याचे अभिनंदन केले.

> **मयंक भाऊचा धक्का ते करंजा जेट्टी पोहून पार करणारा तो पहिला जलतरणपटू ठरला आहे, तर याआधी केलेले धरतर ते करंजा आणि घारापुरी ते करंजा हे दोनही प्रवाह पोहून पार करणारा तो पहिला जलतरणपटू ठरला आहे. त्याला परदेशातील एक तरी खाडी पोहताना पहायचे आहे.**
> **-दिनेश म्हात्रे, मयंकचे वडील**

## संपादकीय

# लांगूलचालनाचा इतिहास

‘वंदे मातरम्’च्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवानिमित्त लोकसभेत दहा तासांची विशेष चर्चा आयोजित करण्यात आली. ‘वंदे मातरम्’ने देशाला स्वातंत्र्यलढ्याची ऊर्जा दिली. तीच ऊर्जा देशातील पुढची पिढी २०४७चा विकसित आणि आत्मनिर्भर भारत घडविण्यासाठी उपयोगात आणेल असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी चर्चेत व्यक्त केला. मुस्लिम लीगपुढे झुकून जवाहरलाल नेहरूंनी व काँग्रेसने या महान राष्ट्रगीताची कडवी गाळली. तिथूनच देशातील विशिष्ट समाजाचे लांगूलचालन सुरू झाले व पुढे देशाची फाळणी झाली. हा इतिहास मोदींनी सांगितलेले मात्र काँग्रेस सदस्यांना रुचले नाही.

**वंदे मातरम्ला दीडशे वर्षे झाल्यानिमित्त लोकसभेत सोमवारी दिवसभर चर्चा आयोजित करण्यात आली. या चर्चेची सुरुवात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली. काँग्रेस आणि पंडित जवाहरलाल नेहरू यांनी या महान राष्ट्रीय गीताचे तुकडे केल्याचा आरोप मोदींनी यावेळी केला. स्वातंत्र्यपूर्व काळात आपल्या देशात इंग्रज त्यांच्या राणीची स्तुती करू पाहात होते. तेव्हा बंकिमचंद्र चटोपाध्याय यांनी भारतीय संस्कृती व या मातृभूमीची महानता कथन करणारे ‘वंदे मातरम्’ हे गीत लिहिले. स्वातंत्र्यलढ्याच्या काळात या गीताचे मोठे योगदान राहिले. सर्वच स्वातंत्र्यसैनिकांसाठी ते आपसूकच ‘राष्ट्रगीत’ बनले. स्वाभाविकच ब्रिटिशांना ते रुचले नाही. बहुसंख्य भारतीयांमध्ये हे गीत लोकप्रिय होते. यात काही मुस्लिम नेते व क्रांतिकारकांचाही समावेश होता, परंतु धर्मांध ‘मुस्लिम लीग’ने मात्र या गीताला विरोध केला. मोहम्मद अली जिना यांनी पत्र लिहून लीगचा या गीताला विरोध असल्याचे जाहीर केले. हे गीत कधीही इस्लामविरोधी नव्हते. बंगालच्या नवाबाच्या व ब्रिटिश साम्राज्याच्या विरोधात ते होते. गीताच्या शब्दश: अर्थाऐवजी त्याचा भावार्थ सहज लक्षात येण्याजोगा होता. त्यामुळे मुस्लिम समाजाने हा प्रतिष्ठेचा प्रश्न करण्याची काहीच गरज नव्हती, परंतु त्याहूनही आश्चर्याची गोष्ट म्हणजे या गीतामुळे मुस्लिमांमध्ये रोष उत्पन्न होत असल्याचे पत्र नेहरूंनी तातडीने सुभाषचंद्र बोस यांना लिहिले व त्यानंतर लगेचच कोलकात्यातील अधिवेशनात काँग्रेस पक्षाने या गीताची समीक्षा केली. त्यानंतर या गीताची केवळ पहिली दोन कडवी अधिकृत ठरवण्यात आली. हा सर्व इतिहास मोदींनी सांगितल्याने काँग्रेस सदस्यांची चांगलीच पंचाईत झाली. १९३७मध्ये मुस्लिम लीगपुढे झुकून नेहरूंनी ‘वंदे मातरम्’मधील ओळी वगळल्या हा इतिहास आहे. तेव्हापासून काँग्रेसने लांगूलचालनाचे राजकारण सुरू केले. ते स्वातंत्र्यप्राप्तीनंतरही सुरू राहिले हे देशाने पाहिले आहे. नेहरूंच्या अशा विचारांमधूनच देशाच्या फाळणीची बीजे रोवली गेली. हा इतिहास मान्य करण्याऐवजी काँग्रेसच्या सदस्यांनी वंदे मातरम्विषयीच्या चर्चेला राजकीय रंग देण्यात येत असल्याची उलटी टीका केली. याचा संबंध त्यांनी पश्चिम बंगालमधील निवडणुकांशी जोडला, परंतु मुस्लिम लीगकडून ‘वंदे मातरम्’ला झालेल्या विरोधाचा नेहरूंनी निषेध का केला नाही? त्याऐवजी वंदे मातरम्वरच प्रश्नचिन्ह का उपस्थित केले गेले? काँग्रेसने तातडीने या गीताचा आढावा का घेतला व पुढे त्याचे तुकडे का केले? यापैकी कुठल्याही प्रश्नाचे उत्तर काँग्रेस पक्ष आजही देऊ शकत नाही. उलट काँग्रेसचा हा निर्णय कायमच सामाजिक सौहार्दाच्या नावाखाली लपवण्यात आला. काँग्रेस लांगूलचालनाच्या राजकारणात गुरफटल्याने देशाला फाळणीसारख्या दुर्दैवी निर्णयाला सामोरे जावे लागले. आता ‘वंदे मातरम्’ला दीडशे वर्षे होत असताना त्याचा गौरव पुनर्स्थापित करण्याची हीच योग्य वेळ आहे.**

# प्राच्यविद्यापंडित श्रीपाद कृष्ण बेलवलकर

श्रीपाद कृष्ण बेलवलकर (१० डिसेंबर १८८० – ८ जानेवारी १९६७). यांची थोर प्राच्यविद्यापंडित म्हणून ओळख राहिली आहे. त्यांचा जन्म नरसोबाची वाडी या प्रसिद्ध क्षेत्री झाला. प्राथमिक शिक्षण कोल्हापूरजवळील हेर्ले गावी, माध्यमिक शिक्षण व महाविद्यालयीन शिक्षण कोल्हापूरच्या राजाराम महाविद्यालयात व पुण्याच्या डेक्कन कॉलेजात झाले.

श्रीपाद बेलवलकर १९०२मध्ये इंग्रजी व संस्कृत हे विषय घेऊन बीए झाले. त्यानंतर डेक्कन कॉलेजात फेलो (१९०२–०४). त्याच काळात शेली व वर्ड्स्वर्थ ह्यांच्या काव्यावर लिहिलेल्या निबंधाला मुंबई विद्यापीठाचे होमजी करसेटची दादी पारितोषिक मिळाले. (१९०३). नंतर इंग्रजी–संस्कृत' इतिहास–राज्यशास्त्र' ग्रीक आणि युरोपीय तत्वज्ञान' असे विषय घेऊन त्यांनी एमएची पदवी तीनवेळा मिळवली. ‘वेदान्त पारितोषिक’ आणि तत्वज्ञानाचे ‘तेलंग सुवर्णपदक’ही त्यांनी मिळवले. काही काळ शिक्षकाची नोकरी केल्यानंतर डेक्कन कॉलेजात क्यूरेटर ह्या पदावर त्यांची नेमणूक झाली. तेथे असताना त्या कॉलेजच्या संग्रहातील व्याकरणविषयक हस्तलिखितांची पहिली वर्णनात्मक सुची त्यांनी तयार केली. त्यातूनच



त्यांचा ‘ सिस्टिम्स ऑफ संस्कृत ग्रामर’ हा शोध निबंध सिद्ध झाला व तो मुंबई विद्यापीठाच्या सुवर्णपदकास पात्र ठरला. पुढे ते अमेरिकेस गेले आणि तेथील हार्व्हर्ड विद्यापीठात भवभूतीच्या उत्तर रामचरितावर प्रबंध लिहून त्यांनी डॉक्टरेट मिळवली (१९१४). या नाटकाचे इंग्रजी आणि मार्मिक टिपासह मराठी भाषांतर त्यांनी प्रसिद्ध केले (इंग्रजी १९१५ मराठी १९१५). अमेरिकेहून परतल्शवर (१९१५) एकूण १८ वर्ष ते डेक्कन कॉलेजात संस्कृतचे प्राध्यापक म्हणून काम करीत होते. प्रध्यापक म्हणून त्यांनी अत्यंत तळमळीने आपल्या व्यसंगाचा लाभ विद्यार्थ्यांना दिला. त्यांच्या विद्यार्थ्यामध्ये डॉ. रा. ना. दांडेकर यांच्यासारख्या प्राच्यविद्यापंडितांचा समावेश होतो. या कालखंडात ते दोन वेळा (१९१७–१८१९२७–३३) भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिराचे मानद सचिव झाले. महाभारताची चिकीत्सक आवृत्ते तयार करण्याच्या या संस्थेच्या प्रकल्पात त्यांचा प्रथमपासूनच सहभाग होता. १९४३ ते १९६१ कालखंडात ते या प्रकल्पाचे प्रमुख संपादक होते व त्यांच्याच हातून हा प्रकल्प पूर्ण झाला. भांडारकर प्राच्यविद्या संशेधन मंदिराची स्थापना, उभारणी व संस्थेला मिळालेले अखिल भारतीय व आंतरराष्ट्रिय कीर्तिचे स्थान यांत बेलवलकरांचा कतृत्वाचा वाटा मोठा आहे.

संशोधनाच्या व लेखनाच्या क्षेत्रात बेलवलकरांनी बजावलेली कामगिरी मोठी आहे. गीता व अभिज्ञानशाकुंतल ह्या ग्रंथाची प्रमाणित आवृत्ती त्यांनी काढली (अनुक्रमे १९४१ १९६५) महाभारतातील भीष्मपर्व व शांतीपर्व ह्यांचे संपादन केले (भीष्मपर्व, १९५७ शांतिपर्व, १९५० ते ५३) दांडीच्या काव्यादर्शाची आवृत्ती काढून (१९२०) त्याचे इंग्रजी भाषांतरही प्रसिद्ध केले (१९२४). भारतीय तत्त्वज्ञानाच्या चिकित्सक इतिहासाची गुरुदेव डॉ.रा. द. रानडे ह्यांच्या सहकार्याने त्यांनी एक योजना आखली व तिच्यातील क्रिएटिव्ह पिरिअड हा वेद, ब्राह्मणे, उपनिषदे यांच्याशी संबंधित असलेला दुसरा खंड लिहिला, संपादिला (१९२७). त्यांनी लिहिलेल्या ग्रंथांत आणि संशोधनलेखांत माठरवृत्ती (१९२४), कॅनन्स ऑफ टेक्स्च्यूअल ॲण्ड हायर क्रिटिसिझम अप्लाइड टू शाकुंतल (१९२५), वेदान्त फिलॉसफी (१९२९), बसु मलिक लेक्चर्स ऑन वेदान्त (१९२९) हे ग्रंथ व ‘डेट ऑफ ईश्वरकृष्ण’, ‘लिटररी स्ट्राटा इन ऋग्वेद’, ‘भास अँड शूद्रक’, ‘अंडर–करंट्स ऑफ जैनिझम’, ‘पर्यंकविद्याइन कौशितकी उपनिषद’ ह्यांसारखे लेख ह्यांचा समावेश होतो. त्यांच्या वैविध्यपूर्ण आणि सखोल व्यासंगाचा प्रत्यय त्यांतून येतो.

अखिल भारतीय प्राच्यविद्या परिषदेच्या विविध वर्षी भरलेल्या अधिवेशनात वैदिक विभागाचे, वेद आणि अवेस्ता विभागाचे आणि तत्त्वज्ञान विभागाचे ते अध्यक्ष होते. १९४३मध्ये या परिषदेचे ते प्रमुख अध्यक्ष झाले. रॉयल एशियाटिक सोसायटीने त्यांना लंडन आणि मुंबर्स शाखांचे सन्मान्य सदस्यत्व दिले होते. भारताच्या राष्ट्रपतींकडून १९६०मध्ये त्यांना ‘संस्कृत पंडित’ म्हणून मानपत्र व आजीव मानधन प्राप्त झाले. पुणे येथे ते निधन पावले.

**–गो. के. भट (मराठी विश्वकोष)**

# आंतरराष्ट्रीय मानवाधिकार दिन

आज आंतरराष्ट्रीय मानवाधिकार दिन. लोकांचे अधिकारांकडे लक्ष वेधून घेण्यासाठी तसेच, जगभरातील नागरिकांच्या मानवाधिकारांप्रती जागरुकता निर्माण करण्यासाठी १९५०पासून १० डिसेंबर हा दिवस आंतरराष्ट्रीय मानवाधिकार दिवस म्हणून साजरा करण्यात येईल, असे संयुक्त राष्ट्रसंघटनेने स्पष्ट केले होते. या दिवसासाठी १० डिसेंबर हीच तारीख निवडण्यामागचं कारण म्हणजे १९४८ साली याच दिवशी जगभरातल्या नागरिकांच्या मानवी हक्कांचे संरक्षण करण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघटनेने एक घोषणा पत्र जाहीर केले होते. हे घोषणा पत्र जगभरातल्या ५००पेक्षा जास्त भाषांत अनुवादीत आहे.

मानवी हक्कांचे महत्त्व आदर्शपणे ५३९ ईसा पूर्वमध्ये समजले. जेव्हा सायरस द ग्रेटच्या सैन्याने बॅबिलोन जिंकला. सायरसने गुलामांना मुक्त केले, सर्व लोकांना त्यांचा स्वतःचा धर्म निवडण्याचा अधिकार असल्याचे घोषित केले आणि वांशिक समानता प्रस्थापित केली. ही तत्त्वे सायरस सिलेंडर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बेक्ड–क्ले सिलिंडरवर




रेकॉर्ड केली गेली, ज्यांच्या तरतुदी मानवी हक्कांच्या सार्वभौमिक घोषणेच्या पहिल्या चार कलमांसाठी प्रेरणा म्हणून काम करतात. १२१५मध्ये मॅग्ना चार्टच्या प्रमोल्गेशनद्वारे ज्याने कायद्याचे राज्य ची कच्ची संकल्पना आणि सर्व व्यक्तींना परिभाषित अधिकार आणि स्वातंत्र्यांची मूलभूत कल्पना सादर केली, जी अनियंत्रित खटला आणि तुरुंगवासापासून संरक्षण देते. मॅग्ना चार्टापूर्वी, कायद्याचे राज्य, जे आता कोणत्याही आधुनिक लोकशाही समाजात सुशासनाचे मुख्य तत्त्व मानले जाते, एक दैवी न्याय म्हणून समजले जात होते.

आपले राष्ट्रीयत्व, निवासस्थान, लिंग, लैंगिक अभिमुखता आणि लिंग ओळख, राष्ट्रीय किंवा वांशिक मूळ, रंग, धर्म, भाषा किंवा इतर कोणत्याही स्थितीची पर्वा न करता मानवाधिकार हे सर्व मानवांसाठी महत्वाचे आहे. कोणत्याही प्रकारचा भेदभाव किंवा छळ न करता आपल्या मानवी हक्कांसाठी आपण सर्व समान पात्र आहोत. यासाठी हा दिवस साजरा केला जातो.

जगभरात दरवर्षी १० डिसेंबर रोजी आंतरराष्ट्रीय मानवाधिकार दिन साजरा केला जातो. १० डिसेंबर १९४८ रोजी प्रथमच संयुक्त राष्ट्र संघाने (UN) मानवाधिकार स्वीकारण्याची घोषणा केली, मात्र याची अधिकृतपणे घोषणा १० डिसेंबर १९५० रोजी करण्यात आली. १९५०मध्ये सर्व देशांना आमंत्रित केल्यानंतर सभेत ठराव ४२३ (V) पास केला आणि सर्व देशांना आणि संबंधित संस्थांना हा दिवस साजरा करण्याबाबत सूचित केले.

संयुक्त राष्ट्र संघाने १० डिसेंबर १९४८ रोजी मानवाधिकारांचा सार्वत्रिक जाहीरनामा जारी करून प्रथमच मानवाच्या हक्कांबद्दल सांगितले. १९५०मध्ये सर्व देशांना आमंत्रित करण्यात येऊन या दिवसाची अधिकृत घोषित करण्यात आली होती. तेव्हापासून दरवर्षी १० डिसेंबर रोजी हा दिवस साजरा केला जातो. मानवी हक्कांची सार्वत्रिक घोषणा ५००हून अधिक भाषांमध्ये उपलब्ध आहे. त्याचवेळी भारतात २८ सप्टेंबर १९९३पासून मानवी हक्क कायदा लागू झाला आणि १२ ऑक्टोबर १९९३ रोजी ‘राष्ट्रीय मानवाधिकार आयोग’ची स्थापना झाली.

राष्ट्रीय मानवाधिकार आयोग राजकीय, आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक कार्य क्षेत्रातही काम करतो. या अंतर्गत नागरिकांना वेतन, एचआयव्ही एड्स, आरोग्य, बालविवाह, महिलांचे हक्क याबाबत जागरूक केले जाते.

**(साभार : इंटरनेट)**



## बदलते तंत्रज्ञान

# ‘या’ चार समस्या दिसल्यास त्वरित बदला तुमचा स्मार्टफोन

स्मार्टफोन आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे, पण काही वेळा फोनमध्ये तांत्रिक गडबड नसतानाही तो आपल्याला एक ‘अलर्ट’ देत असतो की,



आता नवीन फोन घेण्याची वेळ आली आहे. जर तुम्ही वेळीच हा इशारा ओळखला नाही, तर तुमचा महत्त्वाचा डेटा गमावणे, सायबर हल्ल्यांना बळी पडणे किंवा ऐन गरजेच्या वेळी फोन बंद पडणे, अशा समस्यांचा सामना करावा लागू शकतो.

फोनची बॅटरी हेल्थ ही तुमचा फोन जुना झाल्याची सर्वात मोठी ओळख आहे. जर तुमचा फोन ४०–५०% चार्ज असताना अचानक १०–२०%वर आला किंवा तुम्हाला दिवसभरात वारंवार फोन चार्ज करावा लागत असेल. याचा अर्थ बॅटरी खराब झाली आहे आणि हे नवीन स्मार्टफोन घेण्याचे स्पष्ट संकेत आहे. खराब बॅटरीमुळे फोन कधीही बंद पडू शकतो.

प्रत्येक कंपनी एका ठराविक काळानंतर जुन्या फोन्सना अपडेट्स देणे थांबवते. काही कंपन्या २–३ वर्षांसाठी, तर सॅमसंग आणि गुगलसारख्या कंपन्या ५–७ वर्षांसाठी अपडेट्स देतात. जर तुमच्या फोनला सिक्युरिटी अपडेट्स मिळणे बंद झाले असतील, तर हा फोन बदलण्याचा सर्वात योग्य काळ आहे. सुरक्षा अपडेट्सशिवाय तुमचा स्मार्टफोन सायबर हल्ल्यांसाठी खूप संवेदनशील बनतो. जुन्या सॉफ्टवेअरमुळे अनेक नवीन ॲप्स नीट चालत नाहीत आणि फोनचा परफॉरमन्सही ढासळतो.

जर तुम्ही फोन वापरत असताना तो अचानक बंद पडत असेल किंवा स्वतःहून रीस्टार्ट होत असेल, तर हा एक मोठा धोक्याचा संकेत आहे. याचा अर्थ तुमचा फोन आता एक्सपायरी डेटच्या जवळ पोहचला आहे आणि लवकरच तो पूर्णपणे बंद पडू शकतो. या परिस्थितीत, तुमचा महत्त्वाचा डेटा सुरक्षित ठेवण्यासाठी तातडीने नवा फोन घेणे अधिक सुरक्षित आहे तसेच जुन्या फोनमधील डेटाचा बॅकअप घेणे विसरू नका.

फोन जुना झाल्यावर त्याची नेटवर्क पकडण्याची क्षमता कमकुवत होते. नेटवर्क पूर्णपणे गायब होणे किंवा सिग्नलची समस्या वारंवार जाणवणे. ॲप्स वारंवार क्रॅश होणे किंवा फोन खूप हँग होणे किंवा स्लो चालणे. हे सर्व संकेत स्पष्टपणे सांगतात की, आता तुमच्या फोनची क्षमता संपली आहे आणि अपग्रेडची वेळ आली आहे. जुन्या प्रोसेसरमुळे ॲप्सचा ताण तो सहन करू शकत नाही. जर तुमच्या फोनमध्ये वरीलपैकी दोन किंवा अधिक समस्या सतत दिसत असतील, तर नवीन फोन घ्या.

# मराठी लेखक, सूचिकार शंकर दाते

शंकर गणेश दाते हे एक मराठी लेखक, सूचिकार होते. त्यांचा आज स्मृतीदिन (१० डिसेंबर, १९६४) आहे. इ.स. १८०० ते १९५० ह्या १५० वर्षांच्या कालखंडात प्रकाशित झालेल्या मुद्रित मराठी ग्रंथांची विषयवार सूची (मराठी ग्रंथसूची किंवा दातेसूची) त्यांनी दोन भागांत तयार करून प्रकाशित केली. ह्या दोन्ही खंडांत मिळून २६६०७ इतक्या मराठी ग्रंथांची नोंद झालेली आहे.

मराठी ग्रंथसूचीव्यतिरिक्त त्यांनी मराठी लोककथांचे संकलन केले आणि ग्रंथालयशास्त्रावर पुस्तके लिहीली. त्यांनी भारतीय साहित्याची राष्ट्रीय ग्रंथसूची १९०१–१९५१ भाग ३ ह्या ग्रंथातील मराठी विभागाचे संपादनही केले.

दाते ह्यांचा जन्म १७ ऑगस्ट, १९०५ रोजी रत्नागिरी येथे झाला. त्यांचे मूळ घराणे राजापूर तालुक्यातील अडिवरे येथील होते. त्यांचे वडील हे मुंबईच्या कुलाबा वेधशाळेत हेडक्लार्क ह्या पदावर काम करत होते. सेवानिवृत्तीनंतर त्यांनी व्यापारात चांगले यश मिळवले, पण १९१४ साली त्यांचा मृत्यू झाला. त्यानंतर दाते ह्यांचे काका आणि मोठे बंधू ह्यांनी दाते ह्यांचा सांभाळ केला.

पुणे येथील स. प. महाविद्यालयातून दाते ह्यांनी मराठी आणि संकृत ह्या विषयात पदवीसाठी नाव नोंदवले होते. पण लोकसाहित्य ह्या विषयाची आवड निर्माण झाल्याने ते त्या विषयाकडे वळले आणि त्यांनी लोककथांचे



### निमित्त

संकलन प्रकाशित केले.

१९३४पासून त्यांनी मराठी ग्रंथसूचीचे काम हाती घेतले आणि एकट्यानेच काम करून १९६१ साली ते पूर्ण केले. त्यानंतर मराठी नियतकालिकांची सूची करण्याचे त्यांनी ठरवले होते. त्यासाठीची सामग्रीही जमवली होती, मात्र १० डिसेंबर, १९६४ रोजी वयाच्या साठाव्या वर्षी कर्करोगाने त्यांचे निधन झाले.

दाते यांनी १९३४ साली मराठीतील प्रकाशित ग्रंथांची विषयवार सूची करण्याचे काम हाती घेतले आणि २७ वर्षे खपून ते काम १९६१ साली पूर्ण केले. इ. स. १८०० ते १९५० ह्या १५० वर्षांतील मराठी ग्रंथांची विषयवार आणि शास्त्रीय पद्धतीने सूची करून त्यांनी प्रकाशित केली. तसे करताना दाते ह्यांनी सूचीत नोंदवलेले प्रत्येक पुस्तक पाहून मग त्याची नोंद करण्याचे धोरण स्वीकारले होते. मराठी ग्रंथसूची हे मराठी भाषेत कोणकोणत्या विषयावर कोणकोणते ग्रंथ प्रकाशित झाले हे जाणून घेण्यासाठीचे उपयुक्त साधन आहे.

मराठी ग्रंथसूचीत प्रत्येक ग्रंथाविषयी पुढीलप्रमाणे माहिती नोंदवलेली आढळते. ०१. ग्रंथकाराचे नाव, ०२. ग्रंथाचे नाव, ०३. आवृत्ती, ०४. प्रकाशनस्थळ, ०५. प्रकाशक, ०६. पृष्ठसंख्या, ०७. आकार, ०८. चित्रांची माहिती, ०९. मूल्य ह्या माहितीसोबतच मुद्रक आणि मुद्रणस्थळ ही माहितीही ह्या सूचीत नोंदवलेली आहे. तसेच ग्रंथाविषयीची महत्त्वाची इतर माहिती उदा. अनुवादित ग्रंथ असल्यास मूळ ग्रंथ, ग्रंथकार इ. टिपेत नोंदवलेली आहे. प्रत्येक ग्रंथाविषयीची ही माहिती ग्रंथ–वर्णन–कोश ह्या विभागात विषयवार विभागून दिली आहे.

नोंदींच्या वर्गीकरणासाठी ग्रंथालयशास्त्रात वापरण्यात येणारी मेलविल डयुई ह्यांची दशांश–वर्गीकरण–पद्धती वापरली आहे. काही ठिकाणी उदा. चरित्रे काही विशेष शीर्षकांचा वापर करून त्याविषयीचे सर्व ग्रंथ एकत्र सापडण्याची सोय केली आहे. उदा. शिवाजी महाराजांची सर्व चरित्रे. सूचीच्या प्रारंभी दशांश–वर्गीकरण–पद्धतीचे वर्ग आणि उपवर्ग यांची माहिती देण्यात आली आहे तसेच सूचीच्या शेवटी लेखकाचे नाव, ग्रंथाचे नाव, विशेष शीर्षक ह्यांच्या निर्देशसूची दिलेल्या असून त्यायोगे सूचीतील ग्रंथ शोधण्याची सोय करून दिलेली आहे. **(साभार : इंटरनेट)**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# दररोज तीन लिटर पाणी पिण्याचे अद्भूत फायदे

पाणी आपल्या शरीरासाठी सर्वात आवश्यक गोष्टींपैकी एक आहे. ते आपल्याला केवळ हायड्रेट ठेवत नाही, तर त्वचा, पचन, केस आणि एकूण आरोग्य सुधारण्यासही मदत करतं. याबाबत न्यूट्रिशनिस्ट वेनिका जैन यांनी त्यांच्या इंस्टाग्राम हँडलवर एक व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडिओमध्ये त्यांनी ३० दिवस रोज तीन लिटर पाणी पिण्याचा सल्ला दिला आहे. त्यांचे म्हणणे आहे की, जर एखादी व्यक्ती ३० दिवस नियमितपणे तीन लिटर पाणी पित असेल, तर शरीरात अनेक सकारात्मक बदल दिसू शकतात. चला ते समजून घेऊया...



पहिल्या आठवड्यात आपल्याला सतत टॉयलेटला जावं लागू शकतं, कारण किडनी शरीरात जमा झालेले टॉक्सिन आणि एक्स्ट्रा जंक बाहेर टाकू लागतात. काही दिवसांनी लघवीची ही वारंवारता कमी होते. तसेच शरीरातील अतिरिक्त मीठ बाहेर पडू लागतं, ज्यामुळे सूज आणि ब्लोटिंग कमी जाणवते. ही शरीराच्या आत सुरू होणाऱ्या स्वच्छतेची पहिली प्रक्रिया असते.

दुसऱ्या आठवड्यात त्वचेत स्पष्ट बदल दिसू लागतात. पाणी त्वचेच्या पेशींना हायड्रेट करत असल्यामुळे चेहरा नॅचरली चमकू लागतो. त्वचा मुलायम आणि स्मूद दिसते. पचन सुधारतं, मोठ्या आतड्यातून विष्ठा सहज पास होते आणि बद्धकोष्ठतेची समस्या कमी होते. पुरेसे पाणी पिल्यास शरीर भरल्यासारखे वाटते, त्यामुळे खाण्याची क्रेविंगही कमी होते.

तिसऱ्या आठवड्यात लक्ष केंद्रित करण्याची क्षमता सुधारते. रक्ताचा मोठा भाग पाण्याने तयार होत असल्यामुळे, पुरेसे पाणी प्यायल्यावर ब्लड फ्लो सुधारतो आणि मेंदूपर्यंत अधिक ऑक्सिजन पोहोचतो. त्यामुळे मानसिक स्पष्टता वाढते. याशिवाय, पाणी स्नायूंना रिलॅक्स करते, त्यामुळे मसल पेन देखील कमी जाणवतो.

एका महिन्याच्या शेवटी केस आणि नखांमध्येही बदल दिसू लागतात. पाणी पोषक घटकांना शरीराच्या योग्य भागांपर्यंत पोहोचवण्यात मदत करते, त्यामुळे केस आणि नखांची वाढ सुधारते. रक्तदाब नियंत्रणात राहतो आणि हृदयाचे आरोग्य सुधारते. पुरेसे पाणी पिल्याने शरीराची संपूर्ण सिस्टम अधिक प्रभावीपणे काम करते. म्हणजेच काय तर रोज तीन लिटर पाणी पिणे शरीरासाठी अनेक प्रकारे फायदेशीर ठरू शकते, मात्र ज्यांना किडनी किंवा हृदयाशी संबंधित समस्या आहेत, त्यांनी पाण्याचे प्रमाण डॉक्टरांच्या सल्ल्याने ठरवावे.

# वाशिवली येथे वाहतूक सुरक्षा मार्गदर्शन

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पाताळगंगा येथील डॉ. पारनेरकर महाराज विद्यालय वाशिवली येथे अलिबाग वाहतूक सुरक्षा विभाग व रसायनी वाहतूक सुरक्षा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांना वाहतूक सुरक्षा, पालकांना हेल्मेट सक्ती, दररोज होणारे सायबर गुन्हे व व्यसनाधीनता बाबत माहिती देण्यात आली.



या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अनिल पाटील यांनी केले. अलिबाग वाहतूक विभागाच्या वतीने पोलिस उपनिरीक्षक राजेंद्र आरोळे यांनी विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या वाहतूक गुन्ह्यांबद्दल बाबत, हेल्मेटच्या वापराबाबत तसेच सायबर गुन्हे व सजगता या विषयावर सखोल माहिती दिली.

या वेळी रसायनी वाहतूक पोलिस ठाण्याचे उपनिरीक्षक नामदेव डोके व वाहतूक पोलीस अधिकारी निलेश गडाख व शिक्षक–शिक्षीका उपस्थित होते. या सर्व अधिकारींचे आभार डॉ.पारनेरकर महाराज विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ए.आर. पाटील यांनी केले.

# मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर पांढरे पट्टे

**पोलादपूर : प्रतिनिधी**

महाड ते पोलादपूरदरम्यान मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्गावर पांढरे पट्टे रेखाटण्यावे काम गेल्या काही दिवसांपासून प्रगतीपथावर आहे. यादरम्यान चांढवे ते पार्ले, लोहारे या तीन पदरी पुलांवरील वाहतूक अचानक एकेरी सुरू झाल्याचे दिसून येत आहे.



मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वर चांढवे ते पार्ले दरम्यान ओव्हरब्रिजनंतर टोलनाका असून त्यापुढे लोहारेपर्यंत तीन पदरी रूंदीचे तीन ओव्हरब्रिज आहेत. या महामार्गावर पांढरे पट्टे रेखाटण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. या कामादरम्यान, किमान ५०० मीटर आधी वाहन चालकांना पुढे एकेरी पदरावरून वाहतुक सुरू करण्यात आल्याचे कोणतेही सूचना फलक न लावताच ज्या ठिकाणी पट्टे रंगविण्याचे काम सुरू आहे; त्याठिकाणी लाल रंगाचे बॅरीकेटस् उभारून तसेच एक केशरी रंगाचा इंडिकेटर लॅम्प लावून अचानक एकेरी मार्गिका दिसून वाहनचालकांची त्या एकेरी पदरावरून वाहन नेताना तारांबळ उडत असल्याचे दृश्य दिवसांतून अनेकदा दिसून येत आहे.

काही वेळा या लाल रंगाच्या फायबरच्या बॅरिकेटसना वाहनांचा धक्का लागून ते उडविले जात आहेत. चांढवे टोलनाक्यापुढील मुंबई आणि गोव्याकडे जाणाऱ्या दोन्ही तीन पदरी ओव्हरब्रिजवर पांढरे पट्टे रंगविण्याच्या कामामुळे दोन्ही ओव्हरब्रिजवर एकाच मार्गिकेवरून वाहतूक तीन पदरांवरील वाहने अरूंद मार्गिकेवर जाण्यासाठी झुंबड उडाल्यासारखी परिस्थिती होत आहे.

# नागोठणे येथे आज पदयात्रा

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे येथील साई सेवक मंडळाच्या वतीने गुरुवार, ११ डिसेंबर रोजी श्री साईबाबांच्या पदयात्रा व पालखी सोहळ्यास प्रारंभ होणार आहे. सर्व साईभक्तांनी पालखी सोहळ्याच्या प्रारंभी उपस्थित राहावे, असे आवाहन श्री साई सेवक मित्रमंडळ नागोठणे यांनी केले आहे. प्रारंभ नागोठणे गावदेवी मंदिर येथून होणार आहे. १९ डिसेंबर रोजी श्री क्षेत्र शिर्डी येथे पोहचणार आहे. तदनंतर गुरुवार, २५ डिसेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता नागोठणे ग्रामदैवत श्री जोगेश्वरी माता मंदिर प्रांगणात साई भंडाराचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती साई सेवक मित्रमंडळ यांनी दिली आहे.


## स्थावर मिळकतीचा जाहीर अंतिम लिलाव

तमाम लोकांना जाहीर करण्यात येते की, कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल या संस्थेचे खालील नामनिर्देशित केलेले सभासद थकबाकीदार आहेत. त्यांचेकडील थकबाकीची रक्कम वसुल करणेसाठी त्यांच्या खालील स्थावर मिळकतीचा जाहीर अंतिम लिलाव त्याचे नावासमोर दर्शवलेल्या वेळी, रोजी, ठिकाणी होणार आहे. तरी, ज्यांना सदर मिळकतीच्या लिलावात बोली बोलून घ्यावयाची असेल त्यांनी संस्थेशी संपर्क साधून मिळकतीची प्रत व ठिकाण पाहून घ्यावे व लिलावाच्या दिवशी व वेळी उपस्थित रहावे.

| अ. क्र. | थकबाकीदाराचे नाव व पत्ता | मिळकत नं. व गट नं. ठिकाण | क्षेत्र हे.आर. | लिलाव करावयाचा हिस्सा | आकार रु.पै. | लिलावाची तारीख वेळ व ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. रामदास भिकाजी जाधव जुही अपार्टमेंट, रूम नं–डी/१०२, पहिला मजला, प्लॉट नं–६३ अे, सेक्टर–६ अे ता. पनवेल, जि. रायगड, कामोठे | पनवेल **महानगरपालिका यांचे हद्दीतील आणि सब–रजिस्ट्रार पनवेल यांचे अधिकार कक्षेतील मौजे** कामोठे जुही अपार्टमेंट, रूम नं–डी/१०२, पहिला मजला, प्लॉट नं–६३अे, सेक्टर–६ अे, क्षेत्र ३९४ चौ. फुट बिल्टअप | ३९४ चौ. फुट बिल्टअप | ३९४ चौ. फुट बिल्टअप | | शुक्रवार दिः २६/१२/२०२५ वेळः सकाळी ११.०० ते दुपारी १.०० वाजता. कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल रो हाऊस, प्लॉट नं–१, ६२६, मारुती अपार्टमेंट पनवेल ४१०२०६ |

टिप– १) अंतिम लिलावाचे अटी व शर्तीचे वाचन लिलावाचे वेळी करण्यात येईल.
२) अंतिम लिलावापूर्वी कर्ज खाते बंद झाल्यास लिलाव रद्द केला जाईल.
३) येणे रक्कमेचा विचार करून मालमत्तेची विक्री केली जाईल.
४) कोणतेही कारण न दाखवता लिलाव मंजूर अगर नामंजूर करणे व पुढे ढकलणे याबाबतचे अधिकार खालील सही करणार यांनी राखून ठेवला आहे.
५) अपसेट व्हॅल्यू रू. ३२,९९,८९५ /– (अक्षरी रूपये बत्तीस लाख नव्याण्णव हजार आठशे पंच्याण्णव मात्र) याचे वरती बोली करावी लागेल.

स्थळ : पनवेल
दिनांक : ०९/१२/२०२५
जावक क्र. : ३१/६२०/२०२५–२६

**सही/–**
**(सुनिल सदानंद गद्रे)**
**वसुली अधिकारी**
**महाराष्ट्र स.स. अधिनियम १९६० चे**
**कलम १५६ नियम १९६१ चे नियम १०७ अन्वे अधिकार प्राप्त**

## जप्त केलेल्या व ताबे कब्जात असलेल्या स्थावर मालमत्तेच्या विक्रीची अंतिम जाहीर नोटीस

जा.क्र. ३१/६२०/२०२५–२०२६, वसुली–स्थावर जाहीरनामा
वसुली अधिकारी यांचे कार्यालय
दिनांक : ०९/१२/२०२५

ज्या अर्थी कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल या संस्थेच्या कर्जाची थकबाकी अधिक व्याज रक्कम रु. २३,२३,०४९/– (अक्षरी रुपये तेवीस लाख तेवीस हजार एकोणपन्नास मात्र) अधिक दि. १०/१२/२०२५ पासूनचे पुढे होणारा व्याज येणेपोटी श्री. रामदास भिकाजी जाधव रा. कामोठे, जुही अपार्टमेंट, रूम नं–डी/१०२, पहिला मजला, प्लॉट नं–६३ अे, सेक्टर–६ अे, ता–पनवेल, जि–रायगड यांची खाली नमुद केलेली मालमत्ता जप्त करण्यात आली आहे. ज्या अर्थी सदरील रक्कम जप्तीमुळे व विक्रीमुळे उद्भवणाऱ्या कायदेशीर भार व खर्च वसुली करीता उक्त मालमत्ता जाहीर लिलाव पद्धतीने विकणे आवश्यक वाटल्यावरुन अशी नोटीस देण्यात येते की, सदर श्री. रामदास भिकाजी जाधव रा. कामोठे, जुही अपार्टमेंट, रूम नं–डी/१०२, पहिला मजला, प्लॉट नं–६३ अे, सेक्टर– ६ अे, ता–पनवेल, जि–रायगड यांनी उक्त स्थावर व तिच्यापासून मिळणारा भोगवटा व तिची अगर त्यामधील काही भागाची विल्हेवाट लावून मिळणारा लाभांश या प्रकारच्या हक्कांचा सोबत जोडलेल्या लिलावाच्या अटी व शर्तीस व ठरवलेल्या किंमतीस (अपसेट प्राईज) यांना अधिक राहून जास्तीत जास्त बोली बोलणाऱ्यास दि. २६/१२/२०२५ रोजी सकाळी ११.०० ते दु. १.०० वाजता कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल श्री. सुनिल सदानंद गद्रे वसुली अधिकारी हे **जुही अपार्टमेंट, रूम नं–डी/१०२, पहिला मजला, प्लॉट नं–६३ अे, सेक्टर–६ अे, ता–पनवेल, जि–रायगड, कामोठे,** या मिळकतीचे जाहीर लिलावाने विक्री करतील.

दि. १७/११/२०२५, सोमवार रोजी सकाळी ११ ते १ या वेळेत सदर मालमत्तेचा जाहिर लिलाव ठरविण्यात आला होता परंतु या जाहिर लिलाव प्रक्रियेत कोणीही खरेदीदार हजर नसल्याकारणांने पुढील फेर लिलावाची तारीख ०८/१२/२०२५, सोमवार रोजी सकाळी ११ ते १ या वेळेत घेण्यात आला होता परंतु याही वेळेस कोणीही खरेदीदार हजर नसल्याकारणाने लिलावाची प्रकिया अंतिम टप्प्यात येऊन लिलावाच्या विक्रीची फेर व अंतिम जाहिर नोटीस देण्यात येते की, शुक्रवार दिनांक २६/१२/२०२५ रोजीची लिलावाची अंतिम प्रक्रिया सकाळी ११ ते १ या वेळेत होईल.

**स्थावर मिळकतीचा तपशिल**

| अ. क्र. | वसुली दाखला क्रमांक व दिनांक | ज्या पक्षकाराविरुद्ध प्रमाणपत्र देण्यात आले असेल त्याचे नाव | गावाचे नाव व तालुका | गट नं. | क्षेत्र | आकारणी | कब्जेदार सदरी असणारे नाव | हक्क | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | दावा क्र. सी. सी./आर.जी. डी/३८/२०२३ दि. २७/०६/२०२४ | श्री. रामदास भिकाजी जाधव<br>श्री. गोविंद देवराम कदम<br>श्री. श्रीमंत केशव खांडेकर | कामोठे, ता. पनवेल, जि. रायगड. | जुही अपार्टमेंट, रूम नं–डी/१०२, पहिला मजला, प्लॉट नं–६३ अे, सेक्टर–६ अे, ता–पनवेल, जि–रायगड, कामोठे | ३९४ चौ. फुट बिल्टअप | | श्री. रामदास भिकाजी जाधव | नाही | |

उक्त मालमत्तेसंबंधी अन्य कोणत्याही व्यक्तीने प्रतीपादन करण्यात आलेला त्याचा मालकी हक्क भार अगर हितसंबंध याबाबतच्या खरेपणाची कसलीही हमी देण्यात येणार नाही. विक्री आदेश काढण्यात आलेल्या तारखेस थकबाकीदाराकडून देणे असलेली येणे बाकी अधिक व्याज रु. ३२,९९,८९५/– अधिक सरचार्ज व इतर खर्चाच्या वसुलीसाठी विक्रीचा आदेश देण्यात आला आहे.

वसुली अधिकारी श्री. सुनिल सदानंद गद्रे यांनी उक्त मालमत्ता यापूर्वीच जप्ती आदेश क्र. वसुली स्थावर जप्ती दिनांक ०९/०९/२०२५ जप्त करून ताब्यात घेण्यात आली.

**सही/–**
**(सुनिल सदानंद गद्रे)**
**विषेश वसुली व विक्री अधिकारी,**
**वसुली अधिकारी**
**महाराष्ट्र स.स. अधिनियम १९६० चे**
**कलम १५६ नियम १९६१ चे नियम १०७ अन्वे अधिकार प्राप्त**

स्थळ : पनवेल
दिनांक : ०९/१२/२०२५
जावक क्र. : ३१/६२०/२०२५–२६

## जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविणेत येत आहे की, मौजे–हरिग्राम, ता–पनवेल, जि–रायगड, येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तीच्या मालकी हक्काची, मिळकत वा जमीन ही आमचे आशिलांनी कायमस्वरूपी विकण्याचे ठरविले आहे. तरी, सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणेः

**– मिळकतीचे वर्णन–**
**मौजेः हरिग्राम, तालुका–पनवेल, जिल्हा–रायगड**

| गाव | भोगवटदारांचे नाव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे आर.पॉ. | आकारणी रू.पै. |
|---|---|---|---|---|
| हरिग्राम | १.गुरुनाथ महादु कोंडीलकर<br>२.भाई महादु कोंडीलकर<br>दोघेही रा.हरिग्राम, ता.पनवेल जि.रायगड | ६०/२ | ०.३०.९०<br>०.०८.८०<br>०.३९.७० | ७.३० |

सदरहू जागा, जमिन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिट्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार–मदार, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधीतांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजीत व्यवहार पूर्ण करतील व विहीत मुदतीच्या न येणा–या कोणत्याही हरकती/तक्रारी आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

**ठिकाण :– पनवेल**
**दिनांक :– ०९/१२/२०२५**

**सही/–**
**ॲड. चित्तरंजन सुधाकर लाड**
पत्ता–०३, श्री हरेकृष्णा को. ऑ. सोसायटी, प्लॉट नं. १२, सेक्टर ०५, नविन पनवेल ता. पनवेल जि. रायगड ४१०२०६
मो. क्र. ९६९९४९९९६३

## जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविणेत येत आहे की, मौजे–केवाळे, ता–पनवेल, जि–रायगड, येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तीच्या मालकी हक्काची, मिळकत वा जमीन ही आमचे आशिलांनी कायमस्वरूपी विकण्याचे ठरविले आहे. तरी, सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणेः

**– मिळकतीचे वर्णन–**
**मौजेः केवाळे, तालुका–पनवेल, जिल्हा–रायगड**

| गाव | भोगवटदारांचे नाव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे आर.पॉ. | आकारणी रू.पै. |
|---|---|---|---|---|
| केवाळे | १. लक्ष्मण गोटीराम पाटील<br>२.दिलीप पन्नोलाल खरोदिया<br>दोघेही रा.केवाळे ता.पनवेल जि.रायगड | ३२/३ | ०.११.२०<br>०.००.००<br>०.११.२० | ३.९५ |

सदरहू जागा, जमिन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिट्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार–मदार, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधीतांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजीत व्यवहार पूर्ण करतील व विहीत मुदतीच्या न येणा–या कोणत्याही हरकती/तक्रारी आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

**ठिकाण :– पनवेल**
**दिनांक :– ०९/१२/२०२५**

**सही/–**
**ॲड. चित्तरंजन सुधाकर लाड**
पत्ता–०३, श्री हरेकृष्णा को. ऑ. सोसायटी, प्लॉट नं. १२, सेक्टर ०५, नविन पनवेल ता. पनवेल जि. रायगड ४१०२०६
मो. क्र. ९६९९४९९९६३

## बाळगंगा नदी धरण प्रकल्प, ता. पेण

**कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग क्र. २ कोकण भवन, नवी मुंबई**

**जाहीर नोटीस**

**क्रमांकः उविअ/भूसं/कात–१/बा.न.ध. प्र/ निधवली, गागोदे खुर्द/नोटीस /२०२५, दिनांकः– ०१/१२/२०२५**

ज्याअर्थी बाळगंगा नदी धरण प्रकल्पासाठी (पुनर्वसन) मौजे निधवली, गागोदे खुर्द, ता. पेण, जि. रायगड येथील जमिन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी करणेबाबत शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र. संकिर्ण–०३/२०१५ प्र. क्र. ३४/अ–२, दिनांक १२ मे २०१५ व दिनांक ३० सप्टेंबर २०१५ बाळगंगा नदी धरण प्रकल्पासाठी (पुनर्वसन) मधील तरतुदी अनुसरुन खाजगी क्षेत्रातील जमिन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग क्र. २ कोकण भवन, नवी मुंबई यांचेद्वारे व यांचे नाव घेणेबाबत प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी रायगड यांचेकडे सादर करण्यात आला आहे.

आणि त्याअर्थी, मा.जिल्हाधिकारी रायगड यांचे आदेश क्र. भूसंपादन/टे–६/६९९५०/मौजे निधवली, वरसई, गागोदे खुर्द /२०२३ दिनांक २०/०२/२०२३ अन्वये उक्त प्रस्तावासंबंधी शासन निर्णय दिनांक १२ मे २०१५ व दिनांक ३० सप्टेंबर २०१५ आणि तद्नुषंगिक शासन निर्णय तसेच शासन परिपत्रक महसूल व वन विभाग क्र. एल. क्यू. एन. ०१/२०१७/प्र.क्र.१२/अ–२, दिनांक २५ जानेवारी २०१७ व शासन शुध्दीपत्रक दिनांक २७ नोव्हेंबर २०१७अन्वये कार्यवाही करणेची आहे. त्याअर्थी आता,

१. उक्त शासन निर्णय आणि शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार मी श्री. प्रविण पवार, उपविभागीय अधिकारी पेण या द्वारे,
   अ. अनुसूची एक मध्ये नमुद खाजगी क्षेत्रातील जमिन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग क्र. २ कोकण भवन, नवी मुंबई यांच्याद्वारे घेण्याबाबत जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहे.
   ब. प्रकल्पासाठी जमिन थेट खरेदी करताना जिल्हा स्तरीय समिती मार्फत भूसंपादन कायदा २०१३ मधील कलम २६ ते ३० च्या शेड्यूल–१ च्या तरतुदीनुसार संपादित जमिनीसाठी परिगणित होणाऱ्या एकूण मोबदल्याच्या रक्कमेवर २५% रक्कम वाढीव देवून, मोबदला निश्चित करण्यात येईल.
   क. संबंधित भूधारकांकडून शासनाच्या प्रचलित धोरणांप्रमाणे खाजगी वाटाघाटीद्वारे कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग क्र. २ कोकण भवन, नवी मुंबई यांचे द्वारे खरेदी देण्यास स्वेच्छेने तयार असल्याबाबत व जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेला मोबदला संपूर्णतः व अंतिमरित्या स्विकारण्यास तयार असल्याबाबतचे संमतीपत्रे (विकल्प) मागवित आहे.
२. संबंधित भूधारकांनी हि जाहिर नोटीस प्रसिध्द झाल्यानंतर विहित नमुन्यातील संमतीपत्रे (विकल्प) उपविभागीय अधिकारी पेण यांचेकडे दाखल करावीत.
३. संमतीपत्राचा (विकल्प) विहित नमुना उपविभागीय अधिकारी पेण यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध आहे. तसेच सदर नमुना या कार्यालयामार्फत भूधारकांना उपलब्ध करून देण्यात येईल.
४. सदर प्रकल्पासाठी निश्चित करण्यात आलेल्या क्षेत्राच्या आराखड्याची प्रत उपविभागीय अधिकारी पेण यांचे कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत भूधारकांना किंवा हितसंबंधित व्यक्तींना तसेच जनतेस निरिक्षणासाठी खुली ठेवण्यात आली आहे.

**मिळकतीचे वर्णन तालुकाः पेण जिल्हा :– रायगड**

| अ. क्र. | गावाचे नाव | स.नं. | हि.नं. | क्षेत्र हे. आर. | खरेदी करावयाचे क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|
| १ | गागोदे खुर्द | १६ | ० | ०.०९.०० | ०.०९,०० |
| २ | गागोदे खुर्द | २१५ | १ | ०.२४.४० | ०.२४.४० |
| ३ | गागोदे खुर्द | २८९ | ० | ०.०८.६० | ०.०८.६० |
| ४ | गागोदे खुर्द | २९० | ० | ०.१२.६० | ०.१२.६० |
| ५ | गागोदे खुर्द | ३३८ पै. | ० | ०.३३.८० | ०.११.४० |
| ६ | गागोदे खुर्द | ३४३ | ० | ०.२३.८० | ०.२३.८० |
| ७ | गागोदे खुर्द | ३४४ | ० | ०.०२.०० | ०.०२.०० |
| ८ | गागोदे खुर्द | ३४५ | ० | ०.३६.४० | ०.३६.४० |
| ९ | गागोदे खुर्द | ३४८ | ० | ०,३१.४० | ०.३१.४० |
| १० | गागोदे खुर्द | ३७५ | ० | ०.२०.२० | ०,२०.२० |
| ११ | गागोदे खुर्द | ३९६ | ० | ०.४३.५० | ०.४३.५० |
| १२ | गागोदे खुर्द | ३९७ | ० | ०.०७.०० | ०.०७,०० |
| १३ | गागोदे खुर्द | ४०५ | ० | ०.३२.९० | ०.३२.९० |
| १४ | गागोदे खुर्द | ४१० | ० | ०.५६.८० | ०.५६.८० |
| १५ | गागोदे खुर्द | ४११ | ० | ०.११.६० | ०.११.६० |
| १६ | गागोदे खुर्द | ४१४ | ० | २,००.६० | २.००.६० |
| १७ | गागोदे खुर्द | ४१५ | ० | ०.०८.८० | ०.०८.८० |
| १८ | गागोदे खुर्द | ४१२ | अ | २.५०.१० | २.५०,१० |
| १९ | निधवली | २० | ० | ०.११.६० | ०.११.६० |
| २० | निधवली | ३० | १ | ०.०२.३० | ०.०२.३० |
| २१ | निधवली | ३० | २ | ०.३८.२० | ०.३८.२० |
| २२ | निधवली | ३३ | ० | ०.०४.०० | ०.०४,०० |
| २३ | निधवली | ३५ | ० | ०.४८.५० | ०.४८.५० |
| २४ | निधवली | ३७ | ० | ०.१६.७० | ०.१६.७० |
| २५ | निधवली | ३८ | ० | ०.०२.०० | ०.०२.०० |
| २६ | निधवली | ४० | ० | ०.०४.०० | ०.०४.०० |
| २७ | निधवली | ४१ | ० | ०.०८.६० | ०.०८.६० |
| २८ | निधवली | ४२ | ० | ०.११.०० | ०.११.०० |
| २९ | निधवली | ४३ | ० | ०.०३.०० | ०.०३.०० |
| ३० | निधवली | ४५ | ० | ०.०५.०० | ०.०५.०० |

**दिनांक :– ०१/१२/२०२५**
**ठिकाण :– पेण**

**क्र. जिमाका/रायगड/जाहिरात/३०५/१७०३/२०२५**

**सही/–**
**(प्रविण ज्ञानु पवार)**
**उपविभागीय अधिकारी पेण, उपविभाग पेण**

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

**मुदतवाढ सूचना**

**ई निविदा सूचना क्र. ६२/२०२५-२०२६ (मुंबई) करीता**

दिनांक १५/११/२०२५ रोजी दैनिक दैनिक नवाकाळ, मुंबई, दैनिक मिड डे, मुंबई, दैनिक फ्रिप्रेस जरनल,मुंबई, दैनिक नवभारत, मुंबई, दैनिक प्रातःकाल, मुंबई, दैनिक रामप्रहर, रायगड या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामांकरीता https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ई निविदेबाबत कंत्राटदारांचे प्रश्न संकेतस्थळावर नोंदविणे व कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा बाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचेनाव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | अतिरिक्त पाताळगंगा औद्योगिक क्षेत्र.. सरसाई गावातील भूखंड क्रमांक एम-१ व एम-२ साठी पायाभूत सुविधा पुरवणे. | ₹ ६०,४४,६४,५०४.०० |
| २ | शहापूर धेरंड औद्योगिक क्षेत्र ... पोयनाड येथील जलशुध्दीकरण केंद्र ते शहापूर धेरंड औद्योगिक क्षेत्रापर्यंत पाणी पुरवठ्यासाठी १५०० मि.मी. व्यासाची मृदु पोलादी जलवाहिनी पुरवणे, टाकणे व जोडणे तसेच औद्योगिक क्षेत्रात ५०० मि.मी. व्यासाची मृदु पोलादी जलवितरण वाहिन्या पुरवणे. | ₹ ५१,४९,३१,६१६.०० |

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक ११/१२/२०२५ पूर्वी त्यांचे प्रश्न https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक १६/१२/२०२५ पासून https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.

ज्या निविदाधारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

# बेकायदा खाद्यपदार्थ स्टॉल्सवर कारवाईची मागणी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महापालिका हद्दीत तापाच्या रुग्णसंख्येत वाढ होत असताना पनवेल महापालिकाचे आरोग्य विभागाचे अधिकारी नागरिकांना स्वच्छतेचे नियम पाळण्याबाबत सूचना करताना दिसत आहेत. तसेच ताप, सर्दी, खोकला टाळण्यासाठी उपाययोजना करण्याचे आवाहन करीत आहेत, मात्र शहरात उघड्यावर खाद्यपदार्थ बनवून विक्री केली जात आहे. तसेच उघड्यावर मांस विक्री केली जात आहे. तसेच शहरातील बेकायदेशीर खाऊ गल्ल्यांतील कचरा फेरीवाले रस्त्यावर, गटारात टाकतात. या बाबत पालिकेच्या आरोग्य विभागातील



अधिकाऱ्यांनी लक्ष देण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

नविन पनवेल शहरात रेल्वे स्थानक परिसरात स्वच्छतेचे तीन तेरा वाजले आहेत. हीच अवस्था पनवेल एस टी स्टॅन्ड परिसरात असून वर्दळीच्या ठिकाणी टपरीधारकांनी महापालिकेचा कुठलाही व्यवसाय परवाना न घेता टपरीमध्ये हॉटेल, सरबतांच्या गाड्या, वडापाव, अंडा बुर्जीच्या गाड्या राजरोसप्रमाणे सुरू केले असून फूटपाथवर रात्री भांडी धुऊन कचरा रस्त्यावर आजूबाजूच्या गटारात टाकला जात असल्याने परिसरात घाणीचे साम्राज्य आहे. याविषयी अनेक तक्रारी करण्यात आल्या आहेत.

या परिसरात अनधिकृत बांधकामात वाढ होत आहे. सकाळी कामावर जाणाऱ्या चाकरमानी, आजूबाजूच्या सोसायटीच्या रहिवासीना तसेच मॉर्निंग वॉकसाठी ये-जा करणाऱ्या नागरिकांना दुर्गंधीचा सामना करावा लागत आहे. नविन पनवेल शहरातील सेक्टर १७येथील वर्दळीच्या परीसरात बेकायदेशीर खाऊ गल्ल्यांवर पालिकेने आतापर्यंत कुठल्याही प्रकारची कारवाई केली नाही.

पालिका अधिकारी या परिसरात दिवसातून दोन वेळा स्वच्छता दूत हा परिसर स्वच्छ करतात, मात्र येथील बेकायदेशीर खाद्यपदार्थ विक्रेत्यांवर कारवाई होत नसल्याचा आरोप येथील रहिवाशांनी केला आहे. याबाबत पनवेल महापालिकेने वेळीच कारवाई करण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे. तसेच स्वच्छतेविषयीही पावले उचलण्याची मागणी आहे.

## वाशीत विनापरवाना टपऱ्यांवर कारवाई



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून वाशी विभाग कार्यालय अंतर्गत विनापरवाना फेरीवाल्यांवर धडक कारवाईचे सत्र सुरू आहे. मागील काही अनेक दिवसांपासून वाशी रेल्वे स्थानक परिसरात सिडकोच्या अंतर्गत असणाऱ्या व्यावसायिक भूखंडावर प्रतिबंधित असणाऱ्या तंबाखूजन्य पदार्थांची दुकाने मांडून विक्री सुरू होती. त्या दुकानावर वाशिम विभाग कार्यालयाने धडक मोहीम राबवून दुकाने हटवली आहेत.

पालिकेच्या या मोहिमेमुळे विनापरवाना तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करणाऱ्या दुकानदारांचे धाबे दणाणले आणले आहेत. पालिकेच्या अतिक्रमण विभागाने ६३ हजार रुपयांची दंडात्मक कारवाई देखील केली आहे.

केंद्र आणि राज्य सरकारच्या निर्देशानुसार तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करण्यावर प्रतिबंध घालण्यात आले आहे. मात्र असे असताना वाशी रेल्वे स्टेशन परिसरात गजबजलेल्या ठिकाणी हॉटेल आणि इतर व्यवसायिकांच्या अंतर्गत परिसरात विनापरवाना तंबाखूजन्य पदार्थांचे विक्री करणाऱ्या टपऱ्या टाकण्यात आल्या होत्या. शनिवार ६ डिसेंबर रोजी वाशी रेल्वे कीऑक्स, मिनी मार्केट रेस्टॉरंट व बार समोरील पान टपऱ्या महापालिकेने हटवल्या. सुमारे १८ ते २० पान टकऱ्या आणि छुप्या पद्धतीने विक्री करणारे स्टॉल पालिकेने हाटून डम्पिंग ग्राउंड वर जमा केले. पालिकेने या व्यवसायिकांवर कारवाई बरोबरच दंडात्मक कारवाई करून ६३ हजार रुपये वसूल केले आहेत.

महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या आदेशानुसार अतिरिक्त आयुक्त राहुल गेठे, अतिक्रमण उपायुक्त कैलास गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली वाशी विभागाचे सहाय्यक आयुक्त सुखदेव येडवे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण पथकातील अधिकारी, कर्मचाऱ्याने सुरक्षा रक्षकांनी ही कारवाई केली.

दरम्यान, नवी मुंबई महापालिकेमार्फत सातत्याने अनधिकृत फेरीवाले तसेच बांधकामे यांना हटविण्याची मोहीम राबविण्यात येते.

## सार्वजनिक आरोग्य सचिवांची अजिवली येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शुक्रवार ५ डिसेंबर रोजी रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र अजिवली येथे इ.रविंद्रन, सार्वजनिक आरोग्य सचिव, महाराष्ट्र राज्य, डॉ.अशोक नांदापूरकर, उपसंचालक संचालक, परिमंडळ ठाणे विभाग, डॉ.आनंद गोसावी, जिल्हा आरोग्य अधिकारी, अलिबाग रायगड डॉ.निशिकांत पाटील, जिल्हा शल्यचिकित्सक, सामान्य रुग्णालय अलिबाग रायगड,यांनी प्राथमिक आरोग्य केंद्र अजिवली येथे भेट देऊन प्राथमिक आरोग्य केंद्र अजिवली येथील इमारतीची पाहणी केली तसेच आरोग्यविषयक कार्यक्रमांचा आढावा घेतला.

बाह्य रुग्ण विभागात उपस्थित रुग्णांची सुसंवाद साधून त्यांना प्राथमिक आरोग्य केंद्रात मिळणाऱ्या आरोग्य सुविधांबद्दल, तसेच आयुष्यमान भारत गोल्डन कार्ड बद्दल विचारणा केली त्यांचे समवेत डॉ.अपर्णा खेडेकर, तालुका आरोग्य अधिकारी, कार्यालय पनवेल डॉ.सायली मानकर, वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र अजिवली तसेच तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय पनवेल व प्राथमिक आरोग्य केंद्र अजिवली येथील स्टाफ उपस्थित होता.

## नवीन पनवेलमध्ये कलश यात्रा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सत्य संस्कृती चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष पंडित मोहन जोशी यांच्या अध्यक्षतेखाली नवीन पनवेलमध्ये भव्य दिव्य कलश यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. या कलश यात्रेत मोठ्या संख्येने पुरुष, लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, महिला डोक्यावर कलश घेऊन भगवंताचे स्मरण करत सहभागी झाले होते.

४ डिसेंबर रोजी नवीन पनवेल शहरातील सेक्टर सात परिसरातून निघालेली कलश यात्रा सेक्टर दोन, आंबे माता ग्राऊंड या ठिकाणी समाप्त झाली. ५ डिसेंबर ते ११ डिसेंबर दरम्यान अंबे माता ग्राउंड, सेक्टर दोन नवीन पनवेल या ठिकाणी श्री हनुमंत कथेचे आयोजन सत्य संस्कृती चॅरिटेबल ट्रस्ट आणि सनातनी हिंदू परिवार यांच्यातर्फे करण्यात आले आहे. या वेळी रोज पाच ते आठ वाजेपर्यंत हनुमंत कथा सांगण्यात येणार आहे. तर रात्री महाप्रसाद होणार आहे. १२ डिसेंबर रोजी हवन पूर्णाहुती आणि भंडारा होणार आहे. या वेळी आचार्य श्रीराम स्नेही मिश्र हे हनुमंत कथा सांगणार आहेत.



## पनवेल येथे लेखन आणि वक्तृत्व स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कर्नाळा स्पोर्ट्‌स अकॅडमी, बार्न्स कॉलेज ऑफ आर्ट्‌स, सायन्स अँड कॉमर्स, पनवेल येथे ८ डिसेंबर रोजी डीएलएलई व एन एस एस विभागातर्फे क्रिएटिव्ह रायटिंग स्पर्धा व वकृत्व स्पर्धा उत्साहात पार पडल्या. विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेला चालना देणाऱ्या या उपक्रमात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होत आपली चमकदार कामगिरी नोंदवली.



कार्यक्रमासाठी सीईओ डॉ. शिवदास कांबळे, प्राचार्य कल्पेश भोईर, तसेच उपप्राचार्या के.डी. शारा यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. स्पर्धेसाठी दिलेले स्वयंचलित विषय विद्यार्थीमित्र आणि सामाजिक भान जागवणारे होते. अन्न वाचवा, महिला सक्षमीकरण, सोशल मीडिया, पर्यावरणाचे रक्षण, माझे करिअर, आरोग्य सेवा, भारताचे संविधान, निवडणूक साक्षरता, ज्येष्ठ नागरिकांची काळजी इत्यादी विषयांवर विद्यार्थ्यांनी आपले विचार जोमदारपणे व्यक्त केले.

स्पर्धेचे सूत्रसंचालन प्रा. प्रशांत पाटील यांनी केले. तर प्रा. रुपाली अहिवले, प्रा. शुभांगी जोशी व प्रा. तेजल जाधव यांनी परीक्षक म्हणून परीक्षणाची जबाबदारी पार पाडली. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. चंद्रकांत मुकादम, प्रा. गीता कोरके व चेतना मॅडम यांचेही विशेष सहकार्य लाभले.

**पनवेल : अभंगाच्या माध्यमातून समाज प्रबोधन करणारे संत संताजी जगनाडे महाराज जयंतीनिमित्ताने महापालिका मुख्यालयात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या वेळी अतिरीक्त आयुक्त गणेश शेटे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, उपायुक्त अभिषेक पराडकर, उपायुक्त नानासाहेब कामठे, सामान्य प्रशासन किर्ती महाजन, महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.**



## सोनखार स्पोर्ट्‌स फेस्टिवलची जनजागृतीपर शोभायात्रा उत्साहात

**नवी मुंबई : बातमीदार**

सानपाडा, नवी मुंबई येथे 'सोनखार स्पोर्ट्स फेस्टिवल''च्या आयोजनाबाबत विभागातील नागरिकांमध्ये अधिकची जनजागृती करण्यासाठी रविवारी (दि.७) लोकसहभागातून शोभायात्रा काढण्यात आली होती.

विशेष म्हणून या शोभयात्रेत नुकत्याच विश्वविजेत्या भारतीय महिला क्रिकेट टीमच्या गौरवार्थ रथाचा देखावा सादर करून त्याद्वारे महिला सक्षमीकरणाचा संदेश देण्यात आला. या शोभायात्रेत फेस्टिवलचे प्रमुख आयोजक व मार्गदर्शक असलेले नवी मुंबई महापालिकेचे



माजी विरोधी पक्षनेते दशरथ भगत, माजी नगरसेविका फशीबाई भगत, वैजयंती भगत, रुपाली भगत, फेस्टिवलचे मुख्य समन्वयक युवा नेते निशांत भगत व समाजसेवक संदीप भगत यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

स्पर्धेत सहभागी होण्यासाठी जेष्ठ सेक्टर १३ येथील उद्यानातील नागरिक विरंगुळा केंद्र येथे फॉर्म सुविधा केंद्र १५ डिसेंबर २०२५ पर्यंत सुरू असणार आहे.

## उरणमध्ये मेमोग्राफी व पॅप्समेयर मोफत शिबिर

**उरण : वार्ताहर, बातमीदार**

श्री समर्थ कृपा सखी स्वयंसहायता संस्था उरण, जायंट्स ग्रुप ऑफ उरण व इंडियन मेडिकल असोसिएशन उलवे मुंबई ओको केअर सेंटर (एमओसी) कॅन्सर केअर अँड रिसर्च सेंटर पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवरी (दि. ८) मोफत मेमोग्राफी व पॅप्समेयर तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. हे शिबिर बालरोग तज्ञ मोरे हॉस्पिटल आनंद नगर उरण येथे आयोजित केले होते. ३० लाभार्थ्यांनी या शिबिराचा लाभ घेतला.

स्किनिंग मेमोग्राफी ही एक विशिष्ट प्रकारची ब्रेस्ट इमेजिंग आहे जी कमी डोसच्या एक्स-रे चा वापर करून कर्करोग लवकर ओळखते



महिलांना लक्षणे दिसण्यापूर्वी जेव्हा तो सर्वात उपचार करण्यायोग्य असतो. या वेळी लवकर निदान होऊन पुढील उपचारा करण्याकरता सोपे होते त्यामुळे महिलांसाठी ही टेस्ट करणे अतिशय गरजेचे आहे स्तनाच्या कर्करोगाची तपासणी करण्यासाठी दरवर्षी मेमोग्राफी आणि क्लीनिकल ब्रिज तपासणी करणे वयाच्या ६५नंतर सुद्धा डॉक्टरांचा सल्ला घेऊन या टेस्ट केल्या तर आरोग्याच्या दृष्टीने चांगले आहे.

या वेळी उरण मधील डॉक्टर वेल्फेअर असोसिएशनचे डॉक्टर विकास मोरे (अध्यक्ष), डॉ. कृष्णा बोरकर (सचिव), डॉ प्रदीप अटकरी (खजिनदार), डॉ सत्या ठाकरे, डॉ. मोना बोरकर डॉ. अजय कोळी डॉ. घनश्याम पाटील इंडियन मेडिकल असोसिएशन उलवे आदी मान्यवर डॉक्टरांच्या उपस्थितीत मेमोग्राफी शिबिर सोहळ्याचे उद्घाअन सुंदरीत्या पार पडले. उरणमधील पोलीस महिला कर्मचारी यांनी या शिबिराची आपली तपासणी करून घेऊन सुरुवात केली.

या कार्यक्रमासाठी संगीता सचिन ढेरे (श्री समर्थ कृपा सखी स्वयंसहायता संस्था उरण अध्यक्षा), कविता म्हात्रे, वैशाली पाटील, मीना रावल, अभया म्हात्रे, तृप्ती भोईर, सुप्रिया सरफरे, प्रियवंदा तांबटकर मॅडम, देवेंद्र पिंपळे, रोशनलाल मेहता सर्वांचे योगदान महत्त्वाचे आहे.

## शांतीवन येथे विद्यार्थी जनजागृती अभियान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

वाहतूक नियंत्रण व सायबर क्राईम यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना जनजागृती अभियान पोलीस निरीक्षक प्रकाश सकपाळ यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच वाहतूक शाखा, नवीन पनवेल यांच्या आयोजनातून नेरे येथील शांतीवन येथे पार पडले.

राज्य भरातून विविध शैक्षणिक विभागातील शाळा, कॉलेज यांचे शिबीर शांतीवन येथे होत असतात. व्हीजी वाजे कॉलेज मुंबई ईस्ट आणि बंट्स इन्स्टिट्यूट फॉर हाईयर



एज्युकेशन जुईनगर नवी मुंबई या विद्यार्थ्यांना ६ डिसेंबर रोजी वाहतूक व सायबर या विषयी जनजागृती उपक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमस दोन्ही कॉलेजचे १०० ते २०० विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते. या कार्यक्रमामध्ये विध्यार्थ्यांना सुरक्षित वाहतुकीसंदर्भात महत्वाचे संदेश देण्यात आले.

मोटरसायकल चालवतांना हेल्मेट घालणे अनिवार्य आहे. चार चाकी चालवत असाल तर सिटबेल्ट लावणे, धोकादायक पद्धतीने वाहने चालवू नये, ट्राफीक सिग्नल काटेकोर पालन करणे, वेगावर नियंत्रण ठेवणे व वाहन संयमाने चालवणे याविषयी प्रबोधन सत्राचे मार्गदर्शन पोलीस उप निरीक्षक पांडुरंग पवार यांनी केले. विद्यार्थ्यांना नियमांचे पालन करण्याची प्रेरणा देत त्यांनी वाहतुकीतील शिस्त व अपघात कमी करण्यासाठी आवश्यक काळजी आणि सुरक्षिततेचे महत्व यावर सविस्तर मार्गदर्शन केले. व मोबाईलचा वापर कमीत कमी कसा करावा त्यामुळे सायबर क्राईम होणार नाही.

आवश्यक काळजी आणि सुरक्षित कसे राहू यावर मार्गदर्शन केले. कॉलेजचे शिक्षक देशमुख व अनंत गायकर (सु. ए. सो. माध्यमिक विद्यायल केवाळे) हे उपस्थित होते. कार्यक्रमाला विध्यार्थ्यांनी उत्कृष्ट प्रतिसाद दिला असून शाळा, कॉलेज प्रशासन नवीन पनवेल वाहतूक शाखेचे आभार मानले.

## मेडिकल लॅबोरेटरी टेक्निक प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे उद्‌घाटन

**उरण : वार्ताहर**

रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या प्राणिशास्त्र विभागात मेडिकल लॅबोरेटरी टेक्निक (CMLT) या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे उद्‌घाटन जेएनपीए हॉस्पिटल, न्हावा शेवा येथील डॉ. वर्षा यादव यांच्या हस्ते झाले.

कार्यक्रमाचे आयोजन कार्यवाह प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर यांच्या प्रेरणा व मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य गजानन चव्हाण होते, तर समन्वयनाची जबाबदारी आयक्यूएसी समन्वयक डॉ. राहुल पाटील यांनी सांभाळली.

या अभ्यासक्रमासाठी बी.एस्सी. विद्यार्थ्यांनी



उत्साहाने प्रवेश घेतला आहे. उचड्ढ अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना प्रयोगशाळेतील मूलभूत तंत्रज्ञान, तसेच पॅथॉलॉजी प्रयोगशाळेत वापरल्या जाणाऱ्या विविध उपकरणांचे प्रत्यक्ष हाताळणीचे कौशल्य शिकविण्यावर आधारित आहे. या अभ्यासक्रमाच्या समन्वयक डॉ. श्रेया पाटील आहेत.

# पोलादपुरात साकारले २१ वनराई बंधारे




**पोलादपूर : प्रतिनिधी**

उन्हाळ्यात पाणीटंचाईची तीव्रता वाढत असल्याचा पूर्वानुभव लक्षात घेता पोलादपूर पंचायत समिती तालुका कृषी विभागातील कृषी सहाय्यकांना प्रत्येकी पाच असे एकूण १० सहाय्यकांमार्फत ५० वनराई बंधारे बांधण्याचे उदिष्ट देण्यात आले आहे. त्यापैकी ग्रामपंचायतींमार्फत आतापर्यंत २१ वनराई बंधारे बांधले गेले आहेत.

पोलादपूर तालुक्यात उन्हाळ्यामध्ये गुरांच्या पाण्यासोबतच कपडे-भांडी धुण्याच्या तसेच आवश्यक वाटल्यास पिण्याच्या, आंघोळीच्या पाण्यासाठी वनराई बंधारे उपयुक्त ठरत असल्याचे अनेकवेळा समोर झाले आहे. या पार्श्वभूमीवर पंचायत समितीने आतापर्यंत १७ ग्रामपंचायतींमार्फत २१ बंधारे बांधल्याची माहिती कृषी विस्तार अधिकारी मंगेश साळी तसेच अरूण धीवरे यांनी दिली. यामध्ये तुर्भे खुर्द, धामणदिवी, तुर्भे बुद्रुक, काटेतळी, तुर्भे खोंड, कोतवाल खुर्द, देवपूर, धारवली, आडावळे बुद्रुक, देवळे, कुडपण बुद्रुक, परसुले आणि गोवेले या ग्रामपंचायतींनी प्रत्येकी एक; तर सडवली, दिविल, वाकण आणि बोरघर या ग्रामपंचायतींनी प्रत्येकी दोन बंधारे बांधले आहेत.

दरम्यान, पोलादपूर तालुका कृषी अधिकारी वैशाली फडतरे यांच्या मार्गदर्शनाखाली १० कृषी सहाय्यकांच्या माध्यमातून प्रत्येकी पाच वनराई बंधारे बांधण्याचा संकल्प करण्यात आला आहे. अशा प्रकारे तालुक्यात लोकसहभागातून ५० बंधारे उभारण्यात येतील असे प्रयत्न सुरू झाले आहेत.

सडवली येथे महिला बचत गटाच्या माध्यमातून सरपंच तसेच माजी सरपंच बापू जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली वनराई बंधारा बांधण्यात आला. ग्रामविकास अधिकारी त्रिशाला गंभीरे, पंचायत समितीचे अधिकारी मंगेश साळी आणि अरूण धीवरे यांनी या बंधाऱ्याची पाहणी केली.

### रिकामी पोती, रिकाम्या पिशव्यांचा वापर

***सार्वजनिक बांधकाम विभागाचे ठेकेदार आणि तहसील कार्यालयातील कर्मचारी, अधिकारी यांच्या समन्वयातून पोलादपूर तालुक्यातील विविध विकासकामांसाठी वापरण्यात आलेली सिमेंटची रिकामी पोती गोळा करण्यात येऊन या वनराई बंधाऱ्यांची उभारणी मोठ्या प्रमाणात करण्यात येत आहे. काही ठिकाणी खताच्या रिकाम्या पिशव्यांचाही वापर करून वनराई बंधारे बांधण्यात आले आहेत.***

# शैक्षणिक सहलीच्या बसचे बोरघाटात ब्रेक फेल

### सुदैवाने अनर्थ टळला

**खालापूर : प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील जुन्नर निमगाव येथील पंडित जवाहरलाल नेहरू माध्यमिक शाळेतील विद्यार्थी कोकण दर्शनासाठी येत असताना बोरघाटातील खोपोली बायपासपासून दोन किमी अंतरावर असलेल्या मुंबई-पुणे महामार्गावरील खोपोली मिळ गाव ते पटेल नगर यादरम्यान एसटी बसचा ब्रेक फेल झाला. चालकाने बसला नियंत्रित करत बाजूला घेतली. त्यामुळे अनर्थ टळला.

निमगाव जुन्नर येथील १२० विद्यार्थी तीन बसमधून कोकण दर्शनासाठी खोपोलीतील गगनगिरी आश्रमात दर्शनासाठी जात असताना मंगळवारी



(दि. १०) सकाळी ९च्या सुमारास ही घटना घडली. बसमधील ४० विद्यार्थी सुदैवाने बचावले असून कोणीही जखमी नाही. या बसमधील विद्यार्थ्यांना सोबत असलेल्या इतर बसमध्ये शिफ्ट करुन पुढील प्रवासासाठी रवाना करण्यात आले.

याबाबत राज्य परिवहन महामंडळाच्या कर्जत आगाराचे प्रमुख देवेंद्र मोरे यांनी सांगितले की, या घटनेत कोणीही जखमी नसल्याने विद्यार्थ्यांना इतर बसमधून रवाना केले.

# मुरूड तालुका विज्ञान प्रदर्शनाचा शुभारंभ

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यामधील माध्यमिक विद्यालय काशिदच्या भव्य प्रांगणात ५३व्या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचा मोठ्या उत्साहात शुभारंभ झाला. मुरुडचे नायब तहसीलदार संजय तवर यांनी प्राथमिक आणि माध्यमिक शाळांतील बालवैज्ञानिकांनी मांडलेल्या प्रतिकृती दालनांचे फित कापून प्रदर्शनाचे उद्घाटन केले.




विज्ञान प्रदर्शनात प्राथमिक शाळांच्या ४८, तर माध्यमिक शाळांनी १८ प्रतिकृती सादर केल्या. शिक्षकांचे शैक्षणिक साहित्य, प्रयोगशाळा परिचरांचे साहित्य हे यावेळच्या स्पर्धेच्या आकर्षणाचा विषय आहे. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या सोलरवरील सायकल, जलव्यवस्थापन अशा नावीन्यपूर्ण प्रतिकृतींबद्दल आपल्या मार्गदर्शनपर भाषणात संजय तवर यांनी बालवैज्ञानिकांचे कौतुक केले. गटशिक्षणाधिकारी सुनील गवळी यांनी प्रास्ताविकात मार्गदर्शक शिक्षकांना शाब्दिक कौतुकाची थाप दिली, तर विज्ञान प्रदर्शनाचे यशस्वी आयोजन करण्यात हातभार लावणाऱ्या काशिद ग्रामस्थांचा शाल, श्रीफळ देऊन यथोचित सन्मान करुन चिकणी सर्वे, काशिद ग्रामस्थांच्या सहकार्याचा जाणीवपूर्वक उल्लेख केला.


प्रदर्शनास ग्रामविस्तार अधिकारी प्रसाद माळी, शिक्षण विस्तार अधिकारी महेश कवळे, विस्तार अधिकारी सुनील पाटील, केंद्रप्रमुख दिनेश म्हात्रे, काशीद हायस्कूलचे अध्यक्ष विजय शिंदे, माजी सरपंच संतोष राणे, नंदकुमार काते, सुभाष खेडेकर, आर. डी. नाईक, निलेश वारगे, जितेंद्र मकू, काशीद हायस्कूलचे मुख्याध्यापक किशोर गंभे, सर एस.ए. हायस्कूलचे मुख्याध्यापक सरोज राणे, प्रवीण भगत, नितीन मानाजी आदींसह शंभरहून अधिक बालवैज्ञानिक, तालुक्यातील सर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षक, केंद्रप्रमुख साधनव्यक्ती, विशेष शिक्षक, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उद्घाटन सोहळ्याचे सूत्रसंचालन राजेंद्र नाईक आणि जगदीश चवरकर यांनी केले.

# वरसे केंद्रात दत्त जयंती सप्ताह साजरा

**रोहा : प्रतिनिधी**

श्री स्वामी समर्थ सेवा व अध्यात्मिक विकास मार्गात सप्ताह सर्वत्र होत असताना रोहा तालुक्यातील वरसे केंद्रातसुद्धा दत्त जयंती सप्ताह मंगलमय वातावरणात साजरा झाला.

या सप्ताहात हजारो सेवेकरी स्वामींचे दर्शन घेण्यासाठी व आरतीस येत होते. त्याचप्रमाणे प्रहर सेवा, विविध प्रकारचे याग आणि पारायण सेवा यामध्ये भाविक सहभागी झाले होते.




आठवडाभर पहाटेपासून सेवा केंद्रामध्ये दैनंदिन नियोजित सकाळी ८ ते रात्री ८पर्यंत महिला सेवेकरी प्रहर सेवेत सहभागी झाल्या, तर त्यानंतर रात्री ८ ते सकाळी ८पर्यंत पुरुष सेवेकऱ्यांनी प्रहर सेवा देत स्वामींच्या चरणी आपली सेवा अर्पण केली.

सकाळी स्वामींच्या मूर्तीला अभिषेक झाल्यावर भूपाळी आरती, नंतर गुरुचरित्र सामुदायिक पारायण, वाचन झाले. विशेष सेवा नित्य स्वाहाकार व याग सेवा झाली. दिवशी जोगव्याच्या कार्यक्रमाने भाविकांमध्ये भक्तीचे वातावरण निर्माण झाले. या जोगव्याच्या कार्यक्रमात सर्व बालसंस्कारच्या बाल सेवेकऱ्यांनी हौसेने भाग घेतला.

सप्ताह काळात नितीन प्रधान, हरिश्चंद्र येलंगे, सुधीर बारस्कर, दत्तात्रय रावळ, रवींद्र पतंगे यांनी सेवकऱ्यांना विविध विषयांवर तसेच मार्गाच्या १८ विभागांवर मार्गदर्शन केले व महत्त्व सांगितले.

विजय जाधव, संजय पालांडे, श्रीपाद कुलकर्णी, सुरेश पाटील, प्रकाश पाटील, विजय लाड, लहू शहापूरकर, श्री. डांगे, सुधीर राजीवडे, श्री. दगडे, श्री मोटे, बलभीम गायकवाड, श्री. वारगडे, लोटके आदी सेवकऱ्यांच्या मार्गदर्शनात सप्ताह साजरा झाला. सांगतेच्या दिवशी वरसे केंद्रात ग्रामपंचायत सदस्य नरेश पाटील, अमित मोहिते, उतेश कांबळे आदींनी उपस्थिती दर्शविली.

# अंबा नदीपात्रात बुडालेल्या व्यक्तीचा मृतदेह सापडला

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील उन्हेरे गावाजवळील अंबा नदीपात्रात सोमवारी सायंकाळी म्हशी आणण्यासाठी गेलेले झिमा तुकाराम बावधाने (वय ५५) हे पाण्यात बुडाल्याची माहिती पाली पोलिसांना मिळाली. रेस्क्यू टीमने पाण्यात बुडालेल्या व्यक्तीला काढण्याचा प्रयत्न केला, मात्र अंधारामुळे शोधमोहिमेत अडथळे निर्माण झाले होते. रेस्क्यू टीमच्या सहाय्याने मंगळवारी सकाळी शोध घेतला असता पाण्याच्या तळाशी मृतदेह सापडला.

रेस्क्यू टीमचे प्रमुख सागर दहिंबेकर आणि सर्व टीम सदस्य यांनी स्वखर्चाने सामाजिक बांधिलकी जपत तत्काळ मदतीचा हात पुढे ठेवून निस्वार्थ सेवाभावी वृत्ती दाखवून दिली. त्यांनी मृतदेह शोधून बाहेर काढला. रेस्क्यू टीमच्या मानवतावादी प्रेरक कार्याचे कौतुक होत आहे.


## पनवेल महानगरपालिका
**ता. पनवेल, जि. रायगड, पिन ४१० २०६**

**अग्निशमन विभाग दरपत्रके मागविण्यास सुचना**

पनवेल महानगरपालिकेस सन २०२५-२६ या वित्तीय वर्षाकरीता निविदापत्रकांत नमूद केलेनुसार, पनवेल महानगरपालिका व इतर महत्वपूर्ण इमारतींमध्ये आग प्रतिबंध व नियंत्रणासाठी अत्याधुनिक Total Flooding Fire Suppression System (Clean Agent System) बसविणेकरीता पात्र व इच्छुक संस्था / नोंदणीकृत पुरवठाधारक व प्रशिक्षित असलेल्या संस्था यांच्या कडुन सदर कामी निविदा मागविण्यात येत आहेत. या कामी कोरे निविदा प्रपत्र व कामाची तपशिलवार माहिती व www.panvelcorporation.com या दिनांक १०/१२/२०२५ रोजी पासुन संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**जा.क्र.पमपा/जनसंपर्क/३१२५/प्र.क्र.६७३/६९७/२०२५**
**दिनांक : ०९/१२/२०२५**

**सही/-**
**-(कैलास गावडे)**
**उपआयुक्त (मुख्यालय-I)**
**पनवेल महानगरपालिका**



## पनवेल महानगरपालिका
**ता. पनवेल, जि. रायगड, पिन ४१० २०६**

**सार्वत्रिक निवडणूक - २०२५**
**प्रारूप मतदार यादी प्रसिध्दीची सुधारित सूचना**

पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक - २०२५ करिता मा. राज्य निवडणूक आयोगाने उपरोक्त विषयावरील संदर्भाधिन पत्रान्वये २९ महानगरपालिकांच्या सार्वजनिक निवडणुकांकरिता मतदार यादीचा सुधारित कार्यक्रम खालीलप्रमाणे घोषीत केलेला आहे.

| अ.क्र. | निवडणूकीचा टप्पा | दि. २६/११/२०२५ च्या पत्रानुसार निर्धारित केलेले दिनांक | सुधारित दिनांक |
|---|---|---|---|
| १ | प्रारूप मतदार यादीवर दाखल हरकतीवर निर्णय घेऊन प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या अधिप्रमाणित करून प्रसिद्ध करणे | १०/१२/२०२५ | १५/१२/२०२५ |
| २ | मतदान केंद्राच्या ठिकाणांची यादी प्रसिद्ध करणे | १५/१२/२०२५ | २०/१२/२०२५ |
| ३ | मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिद्ध करणे | २२/१२/२०२५ | २७/१२/२०२५ |

**जा.क्र.पमपा/जनसंपर्क/३१२५/प्र.क्र.६७४/६९८/२०२५**
**दिनांक : ०९/१२/२०२५**

**सही/-**
**(मंगेश चितळे)**
**आयुक्त,**
**पनवेल महानगरपालिका**



## अंतिम सभेची नोटीस

खालील नमूद अवसायनातील सहकारी संस्थेची शेवटची सर्वसाधारण सभा संबंधीत अवसायक यांच्या अध्यक्षतेखाली **सहाय्यक निबंधक सहकारी संस्था पनवेल यांचे कार्यालय** कृषि उत्पन्न बाजार समिती आवार, ए-विंग, पहिला मजला, सहकार नगर, मार्केट यार्ड, पनवेल ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६ या कार्यालयात आयोजित केली असून त्याची सविस्तर सभा नोटीस (उपस्थितांच्या अटी व शर्तीसह) सदर कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात आली आहे. तरी संबंधित सस्थेच्या सर्व सभासदांनी नोटीस बोर्डवरील सविस्तर नोटीस पाहून सभेस उपस्थित राहून कामकाजामध्ये भाग घ्यावा.

| अ.क्र. | संस्थेचे नाव | नोंदणी क्रमांक व दिनांक | अवसायकाचे नाव, पद्नाम, कार्यालयचा पत्ता | अंतिम सभेचा दिनांक वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | आद्य क्रांतीवीर उमाजी नाईक सहकारी पतसंस्था मर्या. कळंबोली ता. पनवेल,जि. रायगड | आरजीडी/पीडब्लयूएल / आरएसआर/(सीआर)/५३६/ सन-९९ दि.०२/०८/१९९९ | अश्विनी कुमार शिंदे, सहकारी अधिकारी श्रेणी १ अधिन सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, पनवेल, | दि. २६/१२/२०२५ सकाळी ११.०० |

**सही/-**
**( अश्विनी कुमार शिंदे)**
**(अवसायक)**



## पनवेल महानगरपालिका
**ता. पनवेल, जि. रायगड, पिन ४१० २०६**

**जाहिर सुचना**
**सामान्य प्रशासन विभाग**

नागरिकांमध्ये मतदानासंदर्भात निवडणूकपूर्व जागरूकतेसाठी नागरिक एकत्र आणणारा भव्य एकदिवसीय कार्यक्रम राबविण्यासाठी दरपत्रके मागविण्यात येत आहेत. कामाचा अंदाजित खर्च खालीलप्रमाणे. -

| अ.क्र. | कामाचा तपशिल | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | नागरिकांमध्ये मतदानासंदर्भात निवडणूकपूर्व जागरूकतेसाठी नागरिक एकत्र आणणारा भव्य एकदिवसीय कार्यक्रम राबविण्यासाठी दरपत्रके मागविण्यात येत आहेत. | **१०,००,०००/-** (**GST** सह) |

सदर कामाबाबत अधिक माहिती पनवेल महानगरपालिकेच्या **https://www.panvelcorporation.com** या संकेतस्थळावर दिनांक १०/१२/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर निविदा संकेतस्थळावर दिनांक १६/१२/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत उपलब्ध राहील, इच्छुक निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

**जा.क्र.पमपा/जनसंपर्क/३१२५/**
**प्र.क्र.६७९/७०३/२०२५**
**दिनांक : ०९/१२/२०२५**

**सही/-**
**उप आयुक्त (मुख्यालय)**
**पनवेल महानगरपालिका**



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, मौजे वावर्ले, ता. पनवेल, जि. रायगड येथील काही मिळकती श्रीमती बेला धरम गोधा यांचे मालकीच्या आहेत.

सदर मिळकतींबाबत माझे अशिलांनी सदर मिळकतीचे मालक श्रीमती बेला धरम गोधायांचे सोबत सामंजस्य करार देखिल निष्पादीत केलेला आहे आणि सदर करारान्वये माझे अशिलांचे सदर मिळकतीमद्धये २५ टक्के अधिकार निर्माण झाले आहेत. माझे अशिलांना हे खात्रीलायकरित्या समजले आहे की श्रीमती बेला धरम गोधा हे सदर मिळकत त्रयस्थ इसमास विकणेच्या प्रयत्नात आहेत. सदर मिळकतीबाबत श्री. श्रीमती बेला धरम गोधा यांनी माझे अशिलांसोबत यापुर्वीच व्यवहार केलेला असल्यामुळे आणि सदर व्यवहाराबाबत ठरलेलया मोबदला रक्कमेपैकी काही रक्कम देखिल स्विकारलेली असल्यामुळे सदर मिळकतीमध्ये माझे अशिलांचे हक्क हितसंबंध निर्माण झाले आहेत.

सबब, माझे अशील या जाहीर नोटीसीद्वारे असे जाहीर करत आहेत की, सदर मिळकतीबाबत श्रीमती बेला धरम गोधा हयांच्या सोबत माझे अशिलां व्यतिरीक्त अन्य कोणीही व्यवहार केल्यास सदर व्यवहार माझे अशीलांवर बंधनकारक राहणार नाही, आणि सदर व्यवहाराबाबत विरुध्द योग्य ती कायदेशीर कार्यवाही करणे माझे अशीलांस भाग पडेल आणि त्याचे परिणामांस श्रीमती बेला धरम गोधा तसेच इच्छुक खरेदीदार जबाबदार राहतील याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दिनांक :- १०/१२/२०२५**

**सही/-**
**ॲड. ज्ञानेश्वर श्रीनिवास कुळकर्णी**

**कार्यालयीन पत्ता :-** गाळा नं. १२५, पहिला मजला, महानगरपालिका शॉपीग कॉम्प्लेक्स, वासुदेव बळवंत फडके नाटयगृहाचे जवळ, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड मोबाईल नं. - ८०९७३९९३३१, ई मेल आय.डी. - dsk840@gmail.com



## जाहिर प्रगटन
**सहाय्यक निबंधक सहकारी संस्था पनवेल यांचे कार्यालय**
**कृषि उत्पन्न बाजार समिती आवार, ए-विंग, पहिला मजला, सहकार नगर, मार्केट यार्ड, पनवेल ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६**
**जा.क्र.सनिप/वि-२/अव.संस्था/नि.८९ (४) नोटीस ३३२०/सन-२०२५** **दिनांक : ०९/१२/२०२५**

सहाय्यक निबंधक सहकारी संस्था पनवेल या कार्यालयाच्या अधिकार क्षेत्रातील खालील नमूद सहकारी संस्था त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांकास अंतिम अवसायनात घेवून अवसायकांची नेमणूक करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ८९ (४) अन्वये जाहीर नोटीस देण्यात येते को, ज्या कोणाचे सदरहू संस्थांकडून येणे अगर देणे असेल त्यांनी या नोटीशीचे तारखेपासून पंधरा दिवसांच्या आंत आपला हिशोब पुराव्यानिशी संबंधित अवसायकाकडे सादर करावा आणि येणे असलेल्या रक्कमेची मागणी करावी. तसेच देणे असलेल्या रक्कमेचा व्याजासह आमचेकडे भरणा करावा. वरील मुदतीत येणे रक्कमे बाबत योग्य ती कागदपत्रे दाखल न केल्यास संस्थेस कोणाचे देगणे नाही असे समजण्यात येईल व सदर मुदतीनंतर आपल्या कोणत्याही मागणीचा विचार करण्याचे बंधनकारक राहणार नाही.

तसेच सदर संस्थेच्या नावासमोरील रकान्यामध्ये अंतिम सर्वसाधारण सभेची तारीख नमूद असून सदर संस्थेची शेवटची सर्वसाधारण सभा संबंधीत अवसायक यांच्या अध्यक्षतेखाली या कार्यालयात आयोजित केली असून त्याची सविस्तर सभा नोटीस (उपस्थितांच्या अटी व शर्तीसह) या कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात आली आहे. तरी संबंधित संस्थेच्या सर्व सभासदांनी या कार्यालयाचे नोटीस बोर्डवरील सविस्तर नोटीस पाहून सभेस उपस्थित राहून कामकाजामध्ये भाग घ्यावा


| अ.क्र. | संस्थेचे नाव | नोंदणी क्रमांक व दिनांक | अंतिम अवसायन दिनांक | अवसायकाचे नाव, पद्नाम, कार्यालयचा पत्ता | अंतिम सभा ठेवली असल्यास सभेचा दिनांक वेळ |
|---|---|---|---|---|---|
| १ | आद्य क्रांतीवीर उमाजी नाईक सहकारी पतसंस्था मर्या. कळंबोली ता. पनवेल,जि. रायगड | आरजीडी/पीडब्लयूएल /आरएसआर/ (सीआर)/५३६/सन-९९ दि.०२/०८/१९९९ | जा.क्र.सनिप/ विकास-१ आद्यक्रांतीवीर उमाजी नाईक पतसंस्था मर्या/ कायदा कलम १०२/अंतिम आदेश/४३४/सन २०१० दि.०४/०६/२०१० | अश्विनी कुमार शिंदे, सहकारी अधिकारी श्रेणी १ अधिन सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, पनवेल, | दि. २६/१२/२०२५ सकाळी ११.०० |

**सही/-**
**( अश्विनी कुमार शिंदे)**
**(अवसायक)**

# आयपीएल मिनी ऑक्शनमध्ये ३५० खेळाडू

**मुंबई : प्रतिनिधी**

जगभरातील क्रिकेट चाहत्यांचे लक्ष लागलेल्या आयपीएल २०२६ मिनी लिलावाचा अंतिम पडदा आता उघडणार आहे. बीसीसीआयने १३५५ खेळाडूंमधून केवळ ३५० जणांची अंतिम यादी जाहीर केली आहे. येत्या १६ डिसेंबर रोजी अबू धाबी येथील एतिहाद अरेना येथे हा लिलावाचा सोहळा रंगणार असून यात केवळ ७७ स्लॉट्ससाठी बोली लागतील.



साडेतीनशे खेळाडूंपैकी २४० भारतीय, तर ११० विदेशी खेळाडू आहेत. यंदाच्या लिलावात १८ वर्षांच्या ताज्या दमाच्या तरुणांपासून ते ३९ वर्षांच्या अनुभवी खेळाडूंपर्यंत एकूण ३५० खेळाडू आपले नशीब आजमावणार आहेत. या लिलावातील सर्वात लक्षणीय बाब म्हणजे ७२ टक्के खेळाडू २१ ते ३० या वयोगटातील आहेत. २० टक्के खेळाडू ३१ ते ३९, तर १८ ते २० वर्षांचे आठ टक्के (यात १८ वर्षांचे तीन आणि १९ वर्षांचे १२ खेळाडू सहभागी आहेत).

अफगाणिस्तानचा युवा क्रिकेटपटू वाहिदुल्लाह जादरान (वय : १८ वर्षे १३ दिवस) हा या लिलावातील सर्वात तरुण खेळाडू ठरला आहे. त्याच्यासह भारताचे साहिल पारख (१८ वर्षे सहा महिने दोन दिवस) आणि आर.एस. अम्ब्रिश (१८ वर्षे सहा महिने ११ दिवस) हेही युवा खेळाडू असून त्यांची बेस प्राइस प्रत्येकी ३० लाख आहे.

दुसरीकडे भारताचा जलज सक्सेना (३९ वर्षे) हा यंदाच्या लिलावातील सर्वात वयस्कर खेळाडू आहे. जलजची लिलावासाठीची बेस प्राइस ४० लाख आहे. त्याच्यासोबत ३८ वर्षीय कर्ण शर्मा, उमेश यादव आणि इंग्लंडचा रिचर्ड ग्लीसन हेदेखील लिलावात उपलब्ध असतील. मिनी ऑक्शनची सुरुवात १६ डिसेंबर रोजी भारतीय वेळेनुसार दुपारी २:३० वाजता होईल.

## १० संघांमध्ये ७७ स्लॉट्स

या मिनी लिलावात एकूण ३५० खेळाडू असून १० संघांमध्ये मिळून केवळ ७७ स्लॉट्स (ज्यात ३१ विदेशी खेळाडूंसाठी आरक्षित) भरायचे आहेत. कोलकाता नाइट रायडर्सच्या पर्समध्ये (६४.३० कोटी) सर्वात मोठी रक्कम उपलब्ध आहे आणि त्यांना सर्वाधिक १३ खेळाडू (सहा विदेशी) खरेदी करायचे आहेत. याउलट मुंबई इंडियन्सच्या पर्समध्ये (२.७५ कोटी) सर्वात कमी रक्कम आहे. त्यांना केवळ पाच खेळाडू घ्यायचे आहेत. यादीत कॅमेरून ग्रीन, लियाम लिव्हिंग्स्टन, मथीशा पथीराना आणि वानिंदू हसरंगा यांसारख्या मोठ्या आंतरराष्ट्रीय खेळाडूंची नावे आहेत, मात्र या गटातील भारतीय खेळाडूंमध्ये फक्त व्यंकटेश अय्यर आणि रवी बिश्नोई यांचाच समावेश आहे. याशिवाय, १.५ कोटी रुपये बेस प्राइस असलेल्या नऊ खेळाडूंना संधी मिळाली आहे.

# कबड्डी स्पर्धेत कारावी संघ विजेता



**अलिबाग : प्रतिनिधी**

म्हसोबा क्रीडा मंडळ पेझारी तर्फे आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय पुरुष गटाच्या कबड्डी स्पर्धेत टीबीएम कारावी संघाने विजेतेपद पटकावले. श्री गणेश क्रीडा मंडळ दिवलांग संघ उपविजेता ठरला. नवकिरण क्रीडा मंडळ भेंडखळ संघाने तृतीय, तर जय हनुमान क्रीडा मंडळ धेरंड संघाने चतुर्थ क्रमांक मिळवला.

पेझारी येथे खेळल्या गेलेल्या या स्पर्धेतील अंतिम फेरीच्या सामन्यात टीबीएम कारावी संघाने श्री गणेश दिवलांग संघाचा २७ - २० असा पराभव केला. पहिल्या उपांत्य फेरीच्या सामन्यात कारावी संघाने नवकिरण भेंडखळ संघाचा पराभव केला. दुसऱ्या उपांत्य लढतीत दिवलांग संघाने धेरंड संघावर मात केली होती.

कारावी संघाचा पारस शिर्के याला सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून गौरविण्यात आले. दिवलांग संघाचा पार्थ ठाकूर याला उत्कृष्ट चढाईचे, तर भेंडखळचा अमित ठाकूर पकडीचे पारितोषिक देण्यात आले. धेरंड संघाचा स्मित म्हात्रे पब्लिक हिरो ठरला. दिवलांग संघाचा जय पाटील याला रावडी खेळाडूचे पारितोषिक देण्यात आले.

# थ्रो-बॉल स्पर्धेतील विजेत्यांचे लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून अभिनंदन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गुरुकुल इंटरनॅशनल स्कूलतर्फे आयोजित गुरूकुल ऑलिम्पिक्स २०२५-२६मधील थ्रो-बॉल स्पर्धेत रयत शिक्षण संस्थेच्या उलवे नोड येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलच्या संघाने उल्लेखनीय कामगिरी केली. याबद्दल संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अभिनंदन केले.



क्रीडा शिक्षक संग्राम फोफेरकर यांच्या मार्गदर्शनाखाली खेळणाऱ्या १४ वर्षाखालील मुलांच्या संघाने विजेतेपद पटकावले. या यशाबद्दल विद्यार्थी संघाचे स्कूल मॅनेजमेंट कमिटीतर्फे अभिनंदन करण्यात आले.

या वेळी संस्थेचे जनरल बॉडी सदस्य वाय.टी. देशमुख, आरटीपीएस खारघरच्या मुख्याध्यापिका राज अलोनी, लोकनेते रामशेठ ठाकूर स्कूलच्या मुख्याध्यापिका स्वप्नाली म्हात्रे, सीबीएसईचे मुख्याध्यापक अविनाश कुलकर्णी, 'रयत'चे रायगड विभागीय पीआरओ बाळासाहेब कारंडे, अॅड. राहुल घरत, सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर, स्कूलच्या मुख्याध्यापिका मुक्ता खटावकर आदी उपस्थित होते.

# सीकेटी उच्च माध्यमिक विद्यालयाच्या वार्षिक क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयात ८ ते १३ डिसेंबर या सप्ताहात वार्षिक क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे उद्घाटन इंग्रजी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांच्या हस्ते झाले.



उद्घाटन समारंभास उच्च माध्यमिक विभागाचे प्राचार्य प्रशांत मोरे, इंग्रजी प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका नीलिमा शिंदे, पर्यवेक्षक अजित सोनवणे व स्वाती पाटील, निवृत्त क्रीडा शिक्षक प्रताप शिंदे, विद्यार्थी, शिक्षकवृंद व चतुर्थ श्रेणी कर्मचारी उपस्थित होते. उच्च माध्यमिक विभागातील राज्य, जिल्हा, तालुका, विभाग तसेच शालेय स्तरावर प्राविण्य संपादन केलेल्या क्रीडा खेळाडूंनी क्रीडा ज्योतीचे संचलन केले. प्रमुख पाहुण्यांनी मैदानावरील क्रीडा ज्योत प्रज्वलित करून तसेच विद्यालयाचा क्रीडा ध्वज फडकवून स्पर्धेचे उद्घाटन झाले.

प्रमुख पाहुण्यांनी आपल्या भाषणातून जीवनात खेळाचे महत्त्व स्पष्ट केले व सर्व विद्यार्थ्यांना क्रीडा स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. प्राचार्य प्रशांत मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या क्रीडा स्पर्धेत ज्युनिअर कॉलेज क्रीडा विभागातर्फे विद्यार्थ्यांना क्रीडा भावनेची सामूहिक शपथ देण्यात आली.

या वार्षिक क्रीडा स्पर्धेत १०० मीटर, २०० मीटर, ४०० मीटर, ८०० मीटर धावणे, गोळाफेक, बुद्धिबळ, रस्सीखेच, डॉजबॉल, क्रिकेट यासारख्या वैयक्तिक तसेच सांघिक खेळांचा समावेश आहे. विजेत्या स्पर्धकांना सुवर्ण, रौप्य, कांस्यपदकासह सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येईल.

क्रीडा स्पर्धेचे संपूर्ण नियोजन ज्युनिअर कॉलेजचे क्रीडा शिक्षक अरुण पाटील, मनोज पाटील, माधवी कोळी यांनी केले आहे, तर स्पर्धेचे परीक्षण, समालोचन तसेच शिस्त या सर्व जबाबदाऱ्या शिक्षक बजावत आहेत.

# कराटे लीगमध्ये 'एमबीएमएए'चे सुयश

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

व्हिजन मार्शल आर्ट्स अॅण्ड स्पोर्ट्स असोसिएशनच्या वतीने आयोजित महाराष्ट्र कराटे लीग २०२५ ही राज्यस्तरीय स्पर्धा उत्साहात झाली. या स्पर्धेत मास्टर भूपेंद्र मार्शल आर्ट्स अकॅडमीमधून ४० खेळाडूंनी (१४ मुली + २६ मुले) सहभाग घेत उत्कृष्ट कामगिरी करत सुवर्ण, रौप्य आणि कांस्यपदके जिंकली.



या स्पर्धेत पुणे, रायगड, छत्रपती संभाजीनगर, दौंड, पिंपरी-चिंचवड अशा विविध ठिकाणाहून १५०हून अधिक खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता. यामध्ये मास्टर भूपेंद्र मार्शल आर्ट्स अकॅडमीच्या खेळाडूंनी यश मिळविले.

विजेत्या मुलींमध्ये ऋत्विका नागळे व स्नेहल आडव यांनी सुवर्ण; स्वरा नानासाहेब पिसाळ, वैदेही बाणाईत, नंदिनी कारंडे, मृणाल वाढवळ, सृष्टी जाधव, श्रिया कोरे, अक्षया बनसोडे, सान्वी कदम, निशा सरदार, दीक्षा घाग यांनी रौप्य व कांस्य आणि रूही उमेश जाधव व श्रेया राजपूत यांनी रौप्यपदक जिंकले.

विजेत्या मुलांमध्ये प्रमोद परशुराम थोबरे याने सुवर्ण, संबुद्ध कांबळे, करन सत्रे, अनिमिष सुपेकर, सोहम मोहिते, प्रियांश कचरे, ऋतुराज ठाकूर, अंश पागार, मल्हार कोकणे यांनी रौप्य; तर आदेश कोकणे, कृष्णल पिंगळे, आरव तांबे, देवांश दुबे, पवन सत्रे, सर्वेश चौधरी, दर्शन कोकणे, अर्णव घोरपडे, असद पठाण, सवर शेट्टी, सिद्धार्थ सुपनेकर, मयांक पालांडे, अनुराग शिखरे, अर्णव पाटील, मंथन रोटे, शौर्य शेट्टी व ईशांत डोंगरे यांनी कांस्यपदक जिंकले. सर्व पदकविजेत्यांचे अभिनंदन व कौतुक होत आहे.

# एमपीएसए बॉक्सिंग क्लबच्या खेळाडूंचे यश

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल येथील एमपीएसए बॉक्सिंग क्लबच्या खेळाडूंनी पिंपरी-चिंचवड येथे आयोजित जिल्हास्तरीय बॉक्सिंग स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केली. क्लबच्या अहाना सोमण, सई कारंडे, नेहा झांजे, सम्राट पाटील, संस्कार सूर्यवंशी, आरव कदम या खेळाडूंनी या स्पर्धेत विजय संपादन केला, तर विहंग याला उपविजेतेपदाचा मान मिळाला.

या खेळाडूंना प्रशिक्षक अद्वैत शेंबवणेकर यांचे मार्गदर्शन लाभले. एमपीएसए बॉक्सिंग क्लबच्या यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक होत आहे.








# राष्ट्रीय सिनिअर तायक्कांडो स्पर्धेसाठी सुभाष पाटील पंच प्रमुखपदी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

हैदराबाद येथील जीएमसी बालायोगी इनडोअर स्टेडियममध्ये ११ ते १४ डिसेंबरदरम्यान होणाऱ्या ४१व्या राष्ट्रीय सिनिअर तायक्कांडो स्पर्धेसाठी रायगडचे सुपूत्र तायक्कांदो आंतरराष्ट्रीय पंच व प्रशिक्षक तसेच कॉमनवेल्थ तायक्कांडो रेफरी युनियनचे सदस्य सुभाष पाटील यांची पंच प्रमुख म्हणून निवड झाली आहे.



सुभाष पाटील हे सातवी डिग्री ब्लॅक बेल्ट व आंतरराष्ट्रीय पंच आहेत. त्यांनी आतापर्यंत अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये पंच म्हणून उत्कृष्ट कामगिरी केली आहे. नुकतेच ते दक्षिण आफ्रिकेतून आंतरराष्ट्रीय रेफरी रिफ्रेसर सेमिनार करून परतले आहेत.

राष्ट्रीय सिनिअर तायक्कांडो स्पर्धेसाठी सुभाष पाटील हे ११ डिसेंबर रोजी हैदराबाद येथे रवाना होणार आहेत. त्यांना स्पर्धेसाठी तायक्कांडो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र, रायगड तायक्कांडो असोसिएशनचे सर्व पदाधिकारी यांच्यासह आमदार प्रशांत ठाकूर, आमदार विक्रांत पाटील, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या.

# रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाच्या हर्शिता पाटीलला राज्य किक बॉक्सिंगमध्ये 'कांस्य'

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाच्या हर्शिता संदीप पाटील या विद्यार्थिनीने गोंदियातील आमगाव येथे झालेल्या राज्यस्तरीय किक बॉक्सिंग स्पर्धेत कांस्यपदक जिंकले. हर्शिताला क्रीडा शिक्षक प्रवीण पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.



या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, बोर्ड ऑफ डायरेक्टर संजय भगत, सचिव डॉ. एस.टी. गडदे, स्कूल कमिटी मेंबर प्रभाकर जोशी, प्राचार्य निशा नायर यांनी हर्शिताचे अभिनंदन व कौतुक केले तसेच पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.






दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com